काव्य
६५९
सन १९८०



# रानजाई

गणेश हरी पाटील

REFBK-0005142
REFBK-0005142

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत ११०२
सं. क्रा०४ नं.
ता. २५।७।३५
ठाणें.

# रानजाई

## [ स्फुट कवितांचा सङ्ग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.
ता.
ठाणे.

गणेश हरी पाटील,
बी. ए. बी. टी.

REFBK-0005142
REFBK-0005142
क्र. ५१९६२

डिसेंबर १९३४ ] [ किं. १ रुपया.

प्रकाशक
गणेश हरी पाटील, बी. ए. बी. टी.
२७८ सदाशिव, पुणें नं. २.

भाषान्तरासहित सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.
अनुमतीवांचून यांतील कोणतीही कविता कोणी प्रसिद्ध करूं नये.

मुद्रक
लक्ष्मण भाऊराव कोकाटे,
हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें नं. २.

# आमचीं पुस्तकें

## १ बालशारदा

[ मुलांकरितां निवडक गोड कवितांचा सचित्र सङ्ग्रह; प्राथमिक शाळांतून पुरवणी–कविता–वाचन, बाक्षिस व लायब्ररी यांसाठीं मुंबई व मध्यप्रान्त सरकारनें मन्जूर केलेलें. किंमत ८ आणे. ]

या पुस्तकांत केशवसुत, टिळक, बालकवि, दत्त, माधवानुज, गोविन्दाग्रज, ताम्बे, मायदेव, साधुदास, तिवारी, माधवजूलिअन, गिरीश, यशवन्त, बेहेरे, टेकाडे इ. महाराष्ट्रांतील नामाङ्कित अशा ३५ कवींच्या कविता सङ्कलित केल्या आहेत. मुलांचें काव्य कसें असावें हें या पुस्तकावरून चाङ्गलें समजतें.

**प्रो. ना. के. बेहेरे**–' मुलांकरितां म्हणून आजपर्यंत प्रसिद्ध झालेले जे काव्य–सङ्ग्रह माझ्या पाहण्यांत आले त्यांत या पुस्तकाचा नम्बर पहिला लागतो. '

**ज्ञानप्रकाश**—बालपणींच मुलांच्या ठिकाणीं काव्याची गोडी उत्पन्न करण्याचा सङ्ग्राहकाचा उद्देश यशस्वी होण्यासारखा आहे.

**वैनतेय**—काव्य म्हणजे अवघड शब्दांचा कीस पाडणारें शास्त्र. ही कल्पना शिक्षकांनें झिडकारून दिली पाहिजे. रसिकता, सौंदर्याभिरुचि, शौर्य इ. भावनांची ' विद्यार्थि–वर्गांत ' वाढ करण्याला ' बालशारदे ' सारखे संग्रह फार उपयुक्त होतील. आजचा बालविद्यार्थि ही उद्याची अमोघशक्ति आहे हें ज्या शिक्षकांना पटत असेल ते आपल्या काव्याचा तास मधुर व स्फूर्तिदायक व्हावा म्हणून बालशारदेंतील गीतांचा उपयोग करतील अशी आमची खात्री आहे.

**( श्री. वि. स. खांडेकर )**

## २ सचित्र जोडाक्षरपाठमाला

### ( मराठी इ. पहिलीकरितां; किं. ४ आणे )

मुलांचें बालपुस्तक वाचून झाल्यावर जोडाक्षरघटित शब्द असलेलें पहिलें पुस्तक वाचावयास सुरुवात होते. या पुस्तकांत अक्षरांचा अनुक्रम बालपुस्तकाप्रमाणें घेऊन जोडाक्षरांची मांडणी केली आहे. जोडाक्षरांचा क्रम अगोदर सोपा नंतर अवघड असा धरून, तसेंच जोडाक्षरघटित शब्द मुलांना परिचित व सोपें असे घेऊन धडे लिहिले आहेत. लहान मुलांच्या शिक्षणक्रमांतील सृष्टिनिरीक्षण, चित्रकला, गाणीं, खेळ, गोष्टी यांचा उपयोग या पुस्तकांत एकंदर ३४ धड्यांतून केला आहे. भरपूर सुंदर चित्रें, लहान लहान वाक्यें, टाईप मोठा, भाषा सुंदर व स्वाभाविक, यामुळें पुस्तक अत्यंत मनोरंजक झालें आहे.

# श्री. वा. भा. पाठक एम्. ए. याचीं पुस्तकें.

**१ आशागीत**—( १०८ अभंग ( ओढणी ) व ६० भावगीतें यांचा संग्रह )

पृष्ठें १४० किं. १ रुपया.

चिंतनशीलता व भावनेची आर्तता या दोन विशेषांची छाया कवितेंत बरीच दिसली—ओढणींतलि अभंग पुष्कळ ठिकाणीं उत्तम साधले आहेत...त्यांत व्यक्त झालल्या भावना व कल्पना सुंदर आहेत— **न. चिं. केळकर**

सर्व काव्य स्वयंस्फूर्त, अनुभवसिद्ध, प्रासादिक आणि सहज गाइलेलें असें वाटत.

**श्री. म. माटे.**

श्री. पाठकांच्या कवितेचें वळण स्वतंत्र असून तिच्यांत भावना व विचार यांचा सुंदर मिलाफ झाला आहे. **प्रो. गो. वि. तुळपुळे**

**२ प्रवासी**—गज्जल वृत्तांत लिहिलेलें तीनशें ओळींचें एक लघुकाव्य

पृष्ठें ३२. किं. ४ आणे.

श्री. पाठक यांचा कथनौघ चांगला असल्यामुळें वाचक त्याच्यांत वाहवून गेल्याखेरीज रहात नाहीं. त्यांच्या कल्पना वेचक व वैशिष्ट्यपूर्ण असतात. त्यांची भाषा व रचना सफाइदार असून त्यांचें लक्ष विचारांचें प्रकटीकरण करण्याकडे जास्त असतें व म्हणून तें काव्य लवकर पटतें आणि उमजतेंही. **सकाळ**

......सुंदर लघुकाव्य; श्री. पाठक यांच्या काव्यांतला ' प्रवासी ' कोणत्याही प्रदेशांत संचार करीत नाहीं. त्याचा प्रवास भौतिक सृष्टींतील नाहीं तर अंतःसृष्टींतील—मनःसृष्टींतील आहे. काव्याची रचना मृदु, रसानुकुल, सुश्लिष्ट आहे.

**—महाराष्ट्र—**

**३ नकोत त्या गोष्टी**—( तेरा लघु निबंधांचा संग्रह )

पृष्ठें ८०, किंमत ८ आणे.

नेहमींच्या परिचयाचे परंतु किंचित् दृष्टिआड झालेले विषय आणि त्यांच्या सभोंवती नव्या विचारांची केलेली मनोरंजक गुंफण हें ह्या पुस्तकाचें वैशिष्ट्य होय...बिनसलेले बेत, विसंगती, नकळत ऐकलेलीं संभाषणें, निराळे मार्ग, नवलविशेष वगैरे गोष्टीवजा निबंध यांत आले आहेत—

**पत्ताः— १९८/२२ सदाशिव पुणें २ टिळकरोड.**

# राम राम वि. वि.

तीर्थरूप ‘ दादा ’ यांच्या वत्सल प्रेरणेनें व मित्रांच्या सहानुभूतीमुळें चालू हिंवाळ्यांत ही ‘ रानजाई ’ बहारास येत आहे. काव्यलेखनास सुरवात होऊन तप होऊन गेलें. या अवधींत पुष्कळ कविता लिहून झाल्या व कांहीं प्रसिद्ध झाल्या. त्यांतील कांहीं निवडक कवितांचा संग्रह म्हणजेच हा रानजाईचा बहार.

महाराष्ट्र—शारदेची फुलबाग दिवसेंदिवस भरास येत चालली आहे. या फुलबागेंत ही ‘ रानजाई ’ फुलविण्याचा माझा हा एक अल्प प्रयत्न आहे. रानजाईचा परिचय माझे परम स्नेही प्रसिद्ध ‘ आशागीत ’ कर्ते श्री. वामन भार्गव पाठक यांनीं करून दिलाच आहे. यामुळें माझें काम पुष्कळच सोपें झालें आहे. श्री. पाठक यांची माझी मैत्री अभङ्ग आहे. आमच्या कवितेची अशी एकही ओळ नाहीं कीं ती एकमेकांनीं वाचली नाहीं. माझ्या काव्याचें स्वरूप ते आरंभापासून अवलोकन करीत आले असल्यामुळें त्यासंबंधीं चार शब्द लिहिण्याचा अधिकार त्यांचाच आहे. त्यांच्यावर ही जबाबदारी मी हक्कानें टाकली व ती त्यांनीं मोठ्या हौसेनें स्वीकारलीही.

मी कांहीं बाबतींत मोठा भाग्यवान् समजतों. माझ्या वडिलांनीं माझी ही आवड पाहून मला दिलेलें उत्तेजन; पुण्याच्या प्रख्यात ‘ रविकिरण मण्डळाचे ’ सदस्य गु. गिरीश व प्रो. माधवराव पटवर्धन यांचें प्रेमळ प्रोत्साहन; व मित्रवर्य श्री. वा. भा. पाठक इ. कविमित्रांचा अखण्ड सहवास; अशा अनुकूल स्थितींत मला काव्यलेखन सतत चालू ठेवतां आलें यांत नवल नाहीं.

मात्र हें खरें कीं हें काव्यलेखन रिकामपणचा उद्योग म्हणून हंगामी स्वरूपाचें केलें नाहीं. या बाबतींत मी यथामति परिश्रम घेतले आहेत. कांहीं कसूर राहिली असल्यास तो मी माझा दोष समजेन. आपण जें अनुभविलें व जें आपल्या हृदयाला पटलें तें कवितेंत उत्कटतेनें उतरविण्याचा मीं यत्न केला आहे. कवीनें मनमोकळेंपणानें गावयास पाहिजे असें मला

वाटतें. आपण आपल्या जीवनक्रमाप्रमाणेंच काव्यकलाही अधिक कृत्रिम करीत आहोंत कीं काय यांचें मला भय वाटूं लागलें आहे. कृत्रिमतेपासून परत निसर्गाकडे जावें असेंच मला वाटतें.

माझ्या जन्मभूमीकडे 'रानजाईच्या' बहारांस: आलेल्या वेली मी जेव्हां पाहतों तेव्हां माझें हृदय उचंबळून येतें. रानजाईचें हें विलोभनीय दृश्य जर पाहिलें नसतें तर मी कदाचित् काव्यरचनेस प्रवृत्तही झालों नसतों. हिवाळ्यांत पांढऱ्या शुभ्र फुलांनीं बहरून जाणारी 'रानजाई' हें स्फूर्तीचें प्रतीक समजण्यास काय हरकत आहे ? ज्यांच्या जन्मभूमीवर मी नाचलों बागडलों व तेथें उमलणाऱ्या रानजाई पाहून मी हर्षित झालों त्या त्रिखंडकीर्ति शिवरायाचा मी सदैव जयजयकार करीन. त्याचा अभिमान प्रत्येक मराठ्यास कां असणार नाहीं ?

'रानजाई' प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत मला सर्व स्नेह्यांनीं व हितचिंतकांनीं सहाय्य केलें आहे त्या सर्वांचा मी ऋणी आहें. प्रख्यात कलावन्त श्री. वा. ना. भट यांनीं पुस्तकाचें वेष्टन सजविण्याचें कामीं व येथील हनुमान छापखान्याचे सुविद्य मालक श्री. लक्ष्मणराव कोकाटे यांनीं पुस्तक सुबक छापण्याचे कामीं मोठ्या हौसेनें परिश्रम घेतले म्हणूनच 'रानजाईचें,' हें स्वरूप रसिकांना पहावयास मिळत आहे. असो, अधिक काय लिहावें ! लोभ असावा ही विनंति.

शिवाजी मराठा हायस्कूल, पुणें.
१०-१२-३४.

आपला नम्र
पाटील.

ग्रं. क्र. ५१८४२
स्वच्छ प्रत

# परिचय

बारा तेरा वर्षांपूर्वीची गोष्ट. शाळेला सुट्टी होती म्हणून मी, माझा बालमित्र ' भिडे ' याच्याकडे दुपारीं सहज गेलों. थोडयाच वेळांत एक उंच, काळा-सावळा व तरतरीत नाका डोळ्याचा मुलगा त्या खोलींत शिरला. ' हेच ते पाटील. आपल्या हस्तलिखित मासिकाचे व दैनिक वर्तमानपत्राचे संपादक ' त्यानें मला पाटलांची अशी ओळख करून दिली आणि अजूनहि ती अबाधित आहे. एवढ्या अवधींत कितीदां तरी एकमेकांच्या सुखदुःखांचे आम्ही समभागी झालों आहोंत. कदाचित् ह्यामुळेंच आपल्या प्रेमळ स्वभावास अनुसरून आपल्या रानजाईचा परिचय रसिकांना करून देण्याबद्दल त्यांनीं मला सुचविलें असावें !

श्री. पाटलांच्या काव्याचें सहज दिसून येणारें पहिलें वैशिष्ट्य म्हणजे ज्या निसर्गांत ते बालपणापासून हिंडले, फिरले, ज्या समाजांत ते वावरले व जें जीवन त्यांनीं अनुभविलें, त्यांचेंच त्यांच्या काव्यांत प्रतिबिंबित झालेलें जिवंत शब्दचित्र हें होय. खोटीं समाजचित्रें रंगविण्यांत व कृत्रिम निसर्गवर्णनें करण्यांत त्यांनीं आपल्या काव्याची जीवनकळा गमाविली नाहीं ( पान २ ), याचा अनुभव त्यांचें काव्य वाचतांना पदोपदीं येतो.

वन्द्य शिवप्रभूच्या जन्मभूमींत आपला जन्म झाला व आपलें बालपणही तेथेंच गेलें याबद्दल त्यांस एक प्रकारचा अभिमान वाटतो. एकेकाळीं सह्याद्रीच्या कडे–कपारींतून शिवरायाच्या घोडदौडीचे पडसाद घुमत होते आणि अबलख वारूवर स्वार होऊन व डोक्याला भरजरी मंदील घालून आपलेच वाडवडिल येथें थाटामाटानें मिरवत होते ( पान ८ ), ह्या गोष्टींची तीव्र जाणीव त्यांना आहे म्हणूनच भग्न दुर्गावर वाढलेल्या रानजाईच्या प्रथम दर्शनानें त्यांना

**झुगारुनी वा अवगुण्ठनाला**
**मराठमोळा सुकुमार बाला**
**विहार येथें करण्यास आली**
**कान्ती तिची गौर खुलून गेली** ( पान ६ )

असें वाटतें. रानजाईला निसर्गकन्या कल्पिल्यानें, तिच्यावर कण्वाश्रमांतील शकुन्तलेचा आरोप केल्यानें किंवा

**शेलाच कोणी वनदेवता कीं**
**हिच्या मिषानें विसरून गेली—**

असें म्हटल्यानें त्यांचें समाधान होत नाहीं; पण शिवरायाच्या ह्या स्वातंत्र्य-देवीच्या माधुरीचा आस्वाद घेतांच त्यांचें हृदय

**' घालों असा पाहुनि रानजाई**
**अजून डोळ्यांपुढुनी न जाई '** (पान ७)

असा अनुपमेय आनंद उपभोगूं शकतें. ऐतिहासिक वातावरणाचा त्यांच्या प्रादेशिक कवितावर न कळत गोड परिणाम झाला आहे. म्हणूनच त्यांच्या जन्मभूमीचा गुण त्यांच्या काव्याला लागला आहे असें म्हटल्यास तें वावगें होणार नाहीं.

पोपईच्या बागेंत विहिरीजवळ असलेली कुडाच्या झोपडीवजा पडाळीची आपली राहती जागा ( पान ९० ), वट, नान्दुरखी आणि पिंपळ यांच्या शीतळ व सान्द्र छायेंत आपण घालविलेला काळ (पान ६४), कोणाला नकळत शिन्द्यांच्या सुंदर आम्बेराईकडे पायवाटेनें आपण केलेल्या सहली ( पान ७१ ), किंवा जेथें तरवड बाळें आपले खुळखुळे वाजवीत सोनावळीच्या फुलांबरोबर डोलत आहेत आणि जिथें करडांसह शेरड्या बागडत आहेत असें एकांत स्थल ( पान ९६ ), ह्या सर्वांच्या आठवणींत ते अजूनही रंगून जातात; मग काव्यांत त्यांचें रमणीय पुर्नदर्शन झाल्यास नवल काय ! मात्र एक गोष्ट सांगणें आवश्यक होय. त्यांच्या भावनांना प्रादेशिक पार्श्वभूमी पोषक असली तरी त्यांची भावना कांहीं तेवढ्यासाठींच उचंबळून येते, असें नाहीं. यांत्रिक युगाच्या अतिरेकांत मानवाची होणारी दुर्दशा मागील स्मृतिचित्रांच्या प्रकाशांत ते न्याहाळितात आणि सहजच,

**भांसेल सुसंस्कृत नागर चित्तास तीं**
**रमणीय आणि हृदयंगम पूर्वस्थिति** (पान ४७)

असे आशाजनक सूर त्यांच्या तोंडून निघतात. ज्यास कोणी वाली नाहीं व जीं केवळ उमलत्या जागींच कोमेजून जावयाचीं अशीं ' तृणें व फुलें ' ह्यांच्या दर्शनानें त्यांचें मन गहिंवरून येतें आणि—

**खेड्यांतुन आलों आपण सारेजण**
**सुत आपण त्याचे ठेवुन मागें ऋण**
**फेडल्यावांचुनी तें न कुणा सद्गती**
**अवलोका भेटुन त्याची हीन स्थिती (पान ४७)**

असा समंजसपणाचा इषाराही ते देतात.

श्री. पाटलांचें हें सहानुभूतीचें क्षेत्र केवळ एकप्रांतीय नाहीं, तें सर्वदेशीय व सर्वकालीनच आहे. मळकट बण्डी आणि जुनापुराणा कोट घालून जो भिक्षा मागणारा भिकाऱ्याचा पोर,

**पेणसलीचा तुकडा किंवा फुटकी कवडी काच**
**दृष्टिस पडतां उचलुन घेतो, नाद तयाला हाच (पान ३२)**

त्याच्याशींसुद्धां ते तेव्हांच समरस होऊं शकतात. ह्याच दृष्टीनें त्यांच्या 'गरीब बिचारा कारकून' (पान ६०), किंवा 'डोंबाऱ्याचा खेळ' (पान ११) या कविता विशेष उल्लेखनीय आहेत.

श्री. पाटलांच्या आयुष्यांत 'नैराश्याचे' (पान ४९) व 'अपयशास आव्हान (पान १०९)' करण्याइतके खडतर प्रसंग थोडेफार आले असतील,तरी पण जीवनाचे बिकट रागरंग त्यांना प्रत्यक्ष अनुभवावे लागले नाहींत; म्हणूनच 'गडे तूं' (पान ४४) या कवितेंतील अल्लड बालेच्या चंचल व मनमोकळ्या वृत्तीशीं ते सहज स्पर्धा करूं शकतात, आणि 'रोहिणीच्या' सौंदर्य दर्शनानें त्यांच्या चित्कला हर्ष पावतात (पान १०). हें जरी खरें आहे तरी त्यांच्या आत्मपर कविता एकंदरीत करुणरम्यच आहेत.

ह्यासंबंधीं थोडासा खुलासा केल्यास बरें. कुणालाही आपल्या खाजगी जीवनांतील गोष्टी दुसऱ्यापुढें उघड करणें म्हणजे मोठें संकट वाटतें. सदभिरुचीच्या मर्यादा त्यांत पाळावयाच्या असतात यांत शंका नाहीं; तथापि इतकें करूनही हृदयांतील स्पष्ट भाव जर कवीच्या काव्यांतही आपणांस आढळून आला तर आपणास मोठाच आनंद होतो. पाटलांची ही नि:संकोचवृत्ति आपणास त्यांच्या या विभागावरील कवितांत आढळते. प्रेमळ मातापित्यांच्या वत्सल कृपेचें चांदणें घरांत पडलें असतां व बाहेर शारदीय कोजागिरीचा थाटमाट उडाला असतां त्यांना आपल्या गत भावंडांची-प्रेमळ ताईमाईची आठवण होते आणि तशा शोकविव्हल मनोवृत्तींत ते—

**आम्ही रात्र परस्परांत असतां जागूनिया काढिली**
**आम्हां कृष्णहि रात्र साच असतां कोजागिरी जाहली** ( पान ८२ )

असे कहणोद्गार काढितात. ‘ माझी धाकटी बहीण कमल ’ ( पान २८ ), ‘ मित्रभेट ’ ( पान ५७ ), ‘ एक स्वप्न ’ ( पान ७८ ), वगैरे कविता ह्यामुळेंच आकर्षक वाटतात. विशेषतः ‘ सहधर्मिणीस ’ ( पान १६ ) या कवितेंतील मुग्ध मनोभाव आणि विशुद्ध व प्रेमळ वातावरण हीं विलोभनीय वाटतात. ह्याच्या उलट ‘तान्हुल्याचा मुका’ ( पान ३९ ), या भावगीतांतील उत्कृष्ट करुणरस हृदयस्पर्शी आहे. गांवाला जाण्याच्या गडबडींत आपण आपल्या तान्हुल्याचा मुका घ्यावयास विसरलों, पण तो ‘ चिमणा राजा ’ कायमचाच गांवाला निघून गेला आणि आतां—

**तुझें हासणें, तुझें खिदळणें**
**कधीं मजेनें मुठी चोखणें**
**चिमण्यांवरि टक कधीं लावणें**
**किति अशा आठवूं तुझ्या सुखा ?** ( पान ४० )

असें म्हणणें भाग पडावें यापेक्षां अधिक दारुण विधिविपर्यास कोणता ?

तसेंच विश्वविद्यालयीन वातावरणांत चार वर्षें घालविल्यावर शेवटीं आपल्या प्रेमळ बन्धुभगिनींचा निरोप घेतांना त्यांनीं ‘ वियोगापूर्वी ’ ( पान १२५ ), या कवितेंत जे उद्गार काढिले आहेत त्यांत त्यांचें व्यक्तिमत्व आणि भावनोत्कट हृदय पूर्णपणें व्यक्त झालें आहे.—

**बान्धवांनो चित्तहारी स्वप्न हें गेलें सरोनी**
**आसवांनीं आणि माझे येति हे डोळे भरोनी**
**दिव्य या उद्यान-देशीं पांखरें आलीं जमोनी**
**नाकळे दाही दिशांना जायचीं का हीं उडोनी**

किंवा— ( पान १२५ )

**योग किंवा भाग्य माझें, रम्य या मेळ्यांत आलों**
**वृत्ति माझी दैन्यवाणी जाहली ताजीतवानी**

या ओळी किती वेळ तरी मनांत सारख्या घोळत राहतात आणि पुन्हां पुन्हां वाचाव्याशा वाटतात !

नाट्यगीतांचे आणि बालगीतांचे कांहीं प्रकार श्री० पाटलांनीं आपल्या या संग्रहांत समाविष्ट केले आहेत. पूर्वोक्त प्रकारांत ‘ हा कोण पुरुष ’ ( पान ७९ )

स्थळ प्रत रानजाई
सं. क्र/०५नं. ९१०५
नोंद नं. ७९२०

या गीताचा दर्जा निखालस वरच्या दर्जाचा लागेल. [illegible]ला, दीर्घ मोकळे बेलगाम दौडत जाणारा घोडेस्वार, आणि त्याच्या ओझरत्या दर्शनानें यौवनारूढ ललनेच्या अंतःकरणांत उडणारी खळबळ ह्यांचें चित्र, चलच्चित्रपटाप्रमाणें रसिकांच्या अंतःचक्षूपुढें ह्या गीतांत तरंगत राहतें. विशेषतः—

हें स्वप्न घडींचें पडून गेलें उडून
आठवितां येई पुरतें नच आठवून
आन्धळी जाहल्यें, कशि पाहूं न्याहळून
गत कशी करूं मी गेल्यें ग गोंधळून (पान ८०)

अशी त्यांचीही मनःस्थिती होते. उत्तरोक्त प्रकारांतील ‘ पाखरांची शाळा ’ ( पान ६६ ) आणि ‘ फूलपाखरूं ’ ( पान ६७ ) या कविता आजही बालराज्यांत केव्हांच लोकप्रिय झाल्या आहेत. ‘ पाखरांच्या शाळेंत ’ लहान मुलगा आपल्या आईला आपल्या शाळेची फुशारकी निवेदन करितो आणि पिंपळावर,

चिमण्यांचीं पोरें भारी गोंगाट करिती
व
पारावर जसा यांचा भरतो बाजार

असें गाऱ्हाणें तो सांगतो. म्हणूनच

मास्तरच यांना हवे आमुचे रागीट

असें बजावितो, तेव्हांचें त्याचें हें कौतुक, तसेंच ‘ बालस्वभावास ’ ( पान २१ ) अनुसरून ‘ भूर ’ जाण्याची मौज— कारण

तिथें टपालाची गाडी डाक काय नेतें ? (पान ७०)

ह्या सर्व गोष्टी, पाटलांच्या सहृदयतेची व बालभावनेशीं समरस होणाऱ्या वृत्तीची पूर्ण खातरी पटवितात.

‘ मोहरलेल्या आम्रवृक्षास उद्देशून ’ लिहिलेलें ( पान ३३ ) एक इंग्रजी धर्तीवरील स्तोत्र ( ode ) या संग्रहांत आढळतें. उदात्त व भव्य पार्श्वभूमि आणि वैदर्भीरीति ह्यांची योजना श्री० पाटलांनीं या काव्यांत केलीच आहे, पण आम्रवृक्षास महाकवीची उपमा देण्यांतही औचित्य दाखविलें आहे.

एकेक या तव सुवासिक मञ्जरींत
आकण्ठ कुम्भ भरले असतो सुधेचे
अदृश्य साम्प्रत, तथापि यथावकाशें
नेत्रांस दर्शन सुरम्य घडेल त्यांचें (पान ३४)

हें दृश्य त्यांना

**चित्तांत या मम असंख्य विचार येती**
**थोडे किती ग्रथित या कवनांत होती** **( पान ३५ )**

ह्या विरोधामुळें तर विशेष हृद्य वाटत नसेल ना ?

आतां पाटलांच्या विशिष्ट शाखेंतील कांहीं उज्वल कवितांचा विचार करावयाचा राहिला आहे. ' गस्तवाल्याचें गीत ' ( पान १०० ), ' शाळूच्या शेतांतील शेतकरी ' ( पान २९ ), ' लुटारूंनीं म्हटलेलें गाणें '( पान ८५ ), आणि ' बालकवि ' ( पान ९ ) ह्याच त्या कविता होत.

कवीची कल्पनाशक्ति जशी अद्भुत तशीच ती वास्तविकही असूं शकते. ' गस्तवाल्याच्या गीतांत, ' आपणास या वास्तविक अद्भुततेचें मनोहर नृत्य पाहावयास मिळतें. मराठ्यांचा अस्त व इंग्रजांचा उदय ह्यांच्या संधिकालांत जे विचारतरंग मराठ्यांच्या मनांत घोळत असतील त्यांचें प्रकटीकरण रा. पाटलांनीं या गीतांत केलें आहे. खेडेगावांतील एक गस्तवाला आपला अनुयायी ' धर्माजी वेस्कर ' ह्याच्या समवेत, अपरात्रीस गांवचा खडा पहारा करीत हिंडतो. माळावरील बहिरोबाचें देऊळ आणि त्यावर फडफडणारें पांढरें निशाण पाहून ' खंडोबाची स्वारी ' आतां निघणार म्हणून ' हुश्शार ' राहण्याबद्दल तो आपल्या धन्यास बजावितो, इतक्यांत त्याच्या अंतःश्चक्षुपुढून मराठ्यांच्या वैभवशाली स्वाऱ्या जातात !

**आघाडिस राजे त्यांचे पिछाडीस सरदार**
**चन्देरी घोड्यावरतीं होउन गेले स्वार** **( पान १०१ )**

ह्याचा त्याला प्रत्यय येतो. कदाचित् त्या कालचे हे अवशिष्ट लोकभ्रम असतील, परंतु ऐतिहासिक वातावरणाच्या उठावांत ह्यांचा परिपोष श्री. पाटलांनीं एवढा बेमालूम केला आहे कीं बुद्धिप्रधान मनासही—

**पुण्यशील छत्रपतींच्या प्रथित महाराष्ट्रांत**
**मर्द मराठ्यांच्या स्वाऱ्या अद्यापिहि निघतात** **( पान १०१ )**

असें क्षणभर वाटल्यावांचून राहावयाचें नाहीं. त्यांच्यां ' वटराज ' (पान ११२) या कवितेवरही हें अद्भुतरम्य वातावरण पसरलें आहे. शिवाय त्यांत समाजावर केलेली उपहासगर्भित टीकाही आढळते !

**हाय ! सांगुनी अजाण लोकां दुःखें हृदयांतिल**
**काय फायदा ? जयांस गमतो भूतांचा गोंधळ !** **(पान ११४)**

हा सवाल काळाची रखवालदारी करणाऱ्या तपस्वी वटराजाचा आहे म्हणूनच तो विशेष चिंतनीय होय !

एके काळचे गांवचे कारभारी, पण आतां रात्रींच्या प्रशांत वेळीं शेतकऱ्यांच्या रूपानें आपल्या नातवांच्या मळ्यांत काम करणारे शेतकरी, ह्यांचे मायावी विलास ' शाळूच्या शेतांतील शेतकरी ' ( पान २९ ), ह्या कवितेंत दिसतात. ह्या कवितेबद्दल श्री. पाटील उसनवारीचा निर्वाळा देतात इतकेंच ! एरव्हीं ह्या कवितेंत रूपांतराचा भासही होत नाहीं. ' लुटारूनीं म्हटलेलें गाणें ' ( पान ८५ ) या कवितेबद्दलही असेंच म्हणतां येईल. निसर्गाचा मानवी मनावर होणारा परिणाम एवढाच जरी आशय या कवितेंत आढळतो तरी त्याचें पृथक्करण, लुटारूंच्या अंतःकरणाचे पडदे खोलून त्यांनीं इतक्या तन्मयतेनें केलेलें आहे कीं, त्यांतलि प्रत्येक कडव्याच्या अन्तरेमधील भावनेच्या अवरोहाबरोबर आणि ध्रुवपदांतील भावनेच्या आरोहाबरोबर रसिकांचें मन खालींवर हेलकावे खात राहतें ! खरोखरच या नाट्यगीताचें चित्र–लेखन जों जों अधिकाधिक न्याहाळावें तों तों तें अधिकाधिकच सुंदर दिसूं लागतें ! ह्यांतील कांहीं ओळी उद्धृत करणें म्हणजे मूळच्या काव्याची रसहानि केल्यासारखें होणार आहे.

श्री. पाटलांच्या स्वतंत्र प्रतिभेचा जींत आविष्कार झाला आहे अशी त्यांची ' बालकवि ' ही कविता होय. काव्य-प्रदेशांत ज्याचें नुकतेंच पदार्पण होत आहे अशा बालकवीचें मन म्हणजे अद्भुत कल्पनेचें, भावनेचें, आणि महत्वाकांक्षेचें केवळ क्रीडांगणच ! त्यास त्यावेळीं अरबी काल्पितकथा किती प्रिय असतात ! कळीचा अश्व आणि जादूचा दिवा म्हणजे त्याचें सारसर्वस्वच. त्याची अनुकरणशक्तिही तीव्र असते यांत नवल नाहीं. झोंपेंतसुद्धां तो यक्षिणींच्या कुंजांत विहार करतो आणि इंद्रधनूचें बीन छेडीत राहतो किंवा,

> **या फुलावरुन त्या फुलावरी गुंगलों**
> **गुजगोष्टी बोलत आम्ही त्यांसवे स्वैर रंगलों** ( पान ९३ )

असें तो म्हणतो. या त्याच्या कल्पनाविलासाला जर घरगुती वातावरणाचें मोहक पाठबळ असेल तर ती केवढी स्पृहणीय गोष्ट होईल ! ह्या सर्व अनुभवांचें सुंदर पण कल्पनारंजित भावविश्लेषण श्री. पाटलांनीं या कवितेंत केलें आहे. मेजावर इतस्ततः पुस्तकें पडलीं आहेत आणि तशांतच आपणांस झोंप लागली आहे, इतक्यांत जागें होऊन पहावं तों फळीवर नीट पुस्तकें लागलेलीं दिसावीत,

मग स्वप्नांतल्या देवदूताच्या हातून तर ही गोष्ट झाली नाहींना असा आपणांस भास व्हावा ! पण मागें वळून पाहतांच आपल्या प्रेमळ पित्याचें कुतूहलपूर्ण हास्य आपल्या कानीं यावें !

हा श्री. पाटिलांनीं आपला प्रत्यक्ष अनुभाविलेला प्रसंग तर काव्यांत चित्रित केला नसेलना !

एकंदरींत रानजाईच्या पांढऱ्या शुभ्र विस्ताराप्रमाणेंच रा. पाटलांची कविता विशुद्ध व आकर्षक आहे. तिच्यांत मराठी बाणा पूर्णपणें मुरलेला दिसतो. वृत्तांमुळें नव्हें तर वृत्तीमुळेंच त्यांची कविता अलीकडची वाटते. म्हणूनच आधुनिक इंग्रजी काव्यप्रांतांत आजकाल रूढ झालेला वास्तव-वादही तिच्यांत आढळतो. कांहीं कांहीं ठिकाणीं सूचक भावांची आखणी त्यांनीं कांटे-तोलपणानें केली नाहीं, त्याचेंही कारण हेंच असावें. त्यांनीं आपल्या कविमित्रास पाठविलेल्या एका पत्रांतले उद्गार—

**आहेत पाटलाचे पाल्हाळिक आणि भाबडे बोल**
**पण त्यांत जिव्हाळ्याचें आहे भरपूर साठलें मोल ( पान ११८ )**

त्यांच्या काव्यास यथार्थतेनें लागू पडतात.

थोडेफार अलंकारिक शब्दांत बोलावयाचें झाल्यास, हिरव्या गर्द पानांतून जसें एकादें भरदार कणीस वर तरारून यावें, तसेंच नैसर्गिक पार्श्वभूमीच्या सौंदर्यांत त्यांचें मूळचें काव्य उठून दिसतें, आणि तें वाचीत असतांना, ' ताज्या हुरड्याची लज्जत चाखीतच आपण शाळूच्या शिवारांतून विहार करीत आहोंत कीं काय असा भास होतो. जिनें आपल्या मनाला कायमची भूल पाडिली आहे अशा ' शेवन्तीस ' श्री पाटील धन्यवाद देतात—

**पदर नीट डोईवर**
**मन्द चरणगति सुंदर**
**वळण तुझें फार मधुर !**
**खचित तूं सुशीला— ( पान १४ )**

मराठी रसिकही श्री. पाटलांच्या रानजाईचें लावण्य पाहून असेच उद्गार मोठ्या आनंदानें काढतील अशी मला पूर्ण आशा आहे.

— **वामन भार्गव पाठक.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| नव्या युगाचा कवी ... | १ | तान्हुल्याचा मुका ... ... | ३९ |
| स्फूर्तिदेवतेचें आगमन ... | ३ | सृष्टीचें गायन ... ... | ४१ |
| रानजाई ... .... | ५ | गडे तूं ... ... | ४४ |
| पार्टल ... ... | ८ | जिवलगेच्या हृदयासाठीं ... | ४५ |
| रोहिणी ... ... | १० | हिङ्गणी एक ओसाड खेडें | ४६ |
| डोम्बाऱ्याचा खेळ... ... | ११ | कल्पिलेला कल्पान्त ... | ४८ |
| शेवन्ती ... ... | १४ | नैराश्य ... ... | ४९ |
| सहधर्मिणीस ... ... | १६ | अखेरची तळमळ... ... | ५० |
| गे हास हास ... ... | १७ | तदा येती कैसे ... ... | ५१ |
| मन्दिल ... ... | १८ | इषारा ... ... | ५३ |
| निशीथ-गायक ... ... | १९ | मुलांच्या सृष्टींत ... ... | ५४ |
| बाल-स्वभाव ... ... | २१ | मित्र-वियोग ... ... | ५६ |
| छत्रपति सम्भाजी ... ... | २३ | मित्र-भेट ... ... | ५७ |
| सदाफुली व शेवन्ती ... | २४ | निषेध ... ... | ५९ |
| ईश्वराचें वात्सल्य ... | २५ | गरीब बिचारा कारकून ... | ६० |
| कां मीच .. ... | २७ | तुडवलेला गुलाब ... ... | ६२ |
| माझी धाकटी बहीण कमल | २८ | बा कांहीं तरि गा नवीन ... | ६३ |
| शाळूच्या शेतांतील शेतकरी | २९ | वाटसरू ... ... | ६४ |
| वत्सलता ... ... | ३१ | पांखरांची शाळा ... ... | ६६ |
| भिकाऱ्याचा पोर ... ... | ३२ | फुलपांखरूं ... ... | ६७ |
| मोहरलेल्या आम्रवृक्षास उद्देशून | ३३ | झोका ... ... | ६८ |
| सान्त्वन ... ... | ३७ | गोकर्णीचें फूल ... ... | ६९ |
| सृष्टि दिसे नवबाला ... | ३८ | भूर जाऊं ... ... | ७० |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| दूर कोठें तरी ... ... | ७१ |
| गुल्मोहराचीं फुलें ... ... | ७३ |
| एकच ... ... | ७५ |
| दर्शन ... ... | ७७ |
| एका स्वप्न ... ... | ७८ |
| हा कोण पुरुष ... ... | ७९ |
| कोजागिरी पौर्णिमा ... | ८२ |
| झाडाचीं पानें ... ... | ८३ |
| एक रुष्ट जिवलग मित्रास तिळगूळ | ८४ |
| लुटारूंनीं म्हटलेलें गाणें .... | ८५ |
| श्रावण बाळ ... ... | ८७ |
| माझी जन्मभूमि ... ... | ९० |
| बालकवि ... ... | ९१ |
| तिर्थे ... ... | ९६ |
| तूं कोणी परकामिनी ... | ९८ |
| कोठें तरी चाललों ... | ९९ |
| गस्तवाल्यानें पाहिलेली स्वारी | १०० |
| तुळजापुरचा भुत्या ... | १०२ |
| रोहिणीस ... ... | १०३ |
| पश्चात्ताप ... ... | १०४ |
| माझ्या खेडेगांवीं ... ... | १०७ |
| अपयशास आव्हान ... | १०९ |
| सङ्गीत १ ... ... | [illegible] |
| सङ्गीत २ ... ... | १११ |
| वटराज ... ... | ११२ |
| सुखाचें रहस्य ... ... | ११५ |
| मित्रवर्य त्र्यं. ग. बापट यांस पत्र | ११६ |
| अभङ्ग–लहरी ... ... | ११९ |
| वियोगापूर्वी ... ... | १२६ |

तीर्थरूप दादा

यांचे

चरणीं

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं.
ता.
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...
ता. ...
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. क्र. ५१.४२
संग्रह शाखा

# रानजाई

## नव्या युगाचा कवी

( जाति--मञ्जरी )

अभिवादन तुज हे नव्या युगाच्या कवे !
स्वागतार्थ जमले पहा रसिक हे नवे
गा खुल्या दिलानें गाणीं गा नवनवीं
या काव्यलतेवर येऊं दे टवटवी

दे ठराविकाची मर्यादा सोडुनी
ती अनुकरणाची सोड सोड मोहिनी
शहराची सोडुनि शीव, शिवारांतली
कवितेस तुझ्या खाउं दे हवा मोकळी

हे माळरान, हे डोङ्गर, हीं जङ्गलें,
हीं शेतें, हीं पांखरें, तृणें हीं फुलें,
तुजसवें गड्या गुजगोष्टी करुं पाहती
' आमुचें विचारुन नांव पहा ' बोलती

कल्पनेंतल्या खोट्याच निसर्गामधें
कल्पनेंतल्या खोट्याच समाजामधें--
रङ्गून दवडिली आम्ही जीवनकळा
ती फिरून आणी फुलवुनि अपुला गळा

प्रगटेल ज्यांतुनी स्वानुभूत माधुरी
एकेक फुलव तूं अशी काव्यवल्लरी
कीं दिसेल त्यांनीं भाषा निज साजिरी
मी उधळिन हर्षें तुजवरि ह्या ' मञ्जरी '

## स्फूर्तिदेवतेचें आगमन

( जाति–मुद्रिका )

ये, सुस्वागत तव असो देवि मङ्गले
हीं दिसलीं किति दिवसांनीं दीनास तुझीं पाउलें !

दिसतसें मूल पोरकें माउलीविना
गति तशीच माझी झाली तव कृपासाउलीविना

मज नकळे अवचित कसा थाम्बला गळा
आलाप सुचावे कैसे परि हिंवाळ्यांत कोकिळा ?

करिं वीणा माझ्या, परी तुझी अङ्गुली—
छेडी न तार, मग यावी झङ्कृती कशी चाङ्गली ?

पसरलें वरी आकाश निळें मोकळें
तळमळें व्यर्थ विहराया पांखरूं लुळेंपाङ्गळें

तव आगमनें ही जाय दुरी अवकळा
यक्षिणिच्या काण्डीचा गे ये अद्‌भुत अनुभव मला

हृद्‌यांत आसदीपिका सतत तेवते
उजळिला तिनें गाभारा हा प्रभाव तव देवते

तव वरदहस्त लाभतां शिरीं वत्सले
टवटवित कसें उल्हासें लेंकरूं दिसूं लागलें !

आपैसे आले पङ्ख मला पांखरा
अम्बरीं भरारी घ्याया ये हुरूप आतां खरा

वीणेची लागे तार, गळा हो खुला
मधुमासीं मधुतर लाधे कोकिळास गायनकळा

ऋतु भिन्न जरी सजविती बाह्यसृष्टिला
मम हृदीं तुझ्या साङ्गातीं चिर वसन्तऋतु रङ्गला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
स्थळ प्रत
सं. काव्य. ९१०५
ता. २८/१/३५
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नोंद क्र. ५९२०

## रानजाई

( वृत्त–उपजाति )

होती हिवाळ्यांतिल ती पहाट
वहात होता अति शीत वात
गेली हिंवानें तनु गारठून
तसाच गेलों गड मी चढून

त्या भग्न दुर्गांवर ठायिंठायीं
अव्यक्त होता इतिहास कांहीं
तो वाचिला आन्तर भावनांनीं
आले ध्वनी गूढ असङ्ख्य कानीं

भारावल्या वृत्ति, तशा स्थितींत
होतों उभा पाहत आसमन्त
तों भग्न बुर्जांवर लक्ष जाई
मी पाहिली सुन्दर रानजाई

## रानजाई

श्वेताम्बरा लेवुन वीरबाला
धैर्यें जणूं जात चढून किल्ला !
निसर्गकन्या अथवा महीची
दावी खुमारी निज यौवनाची !

झुगारुनी वा अवगुण्ठनाला
मराठमोळा सुकुमार बाला
विहार येथें करण्यास आली
कान्ती तिची गौर खुलून गेली !

बघून हीतें स्मृति होय साची
कण्वाश्रमांतील शकुन्तलेची
ती भीरु लज्जाकुल नित्य होई
हिची धिटाई मन फार मोही

कीं वीचि आकाशतरङ्गिणीची
हिच्या मिषें व्यक्त इथून झाली !
शेलाच कोणी वनदेवता कीं
हिच्या मिषानें, विसरून गेली !

देऊन कांहीं मधुरोपमाही
झालें समाधान मनास नाहीं

तो उग्र किंचित् परि गोड गन्ध
सेवून आनन्द मिळे विशुद्ध

त्या शुभ्र पुष्पान्वित वल्लरींत
पावित्र्य झालें मजला प्रतीत
झाली तिच्याठायिं विलीन वृत्ति
आभासली तों मज दिव्य मूर्ति

जी का महाराष्ट्र–महाविभूति
शिवप्रभू वन्द्य दिगन्तकीर्ति !
स्वातंत्र्यदेवीच गमे तयाची
हिच्या मिषें हो अवतीर्ण साची !

तरीच ही दुर्गम दुर्गदेशीं
क्रीडा करी स्वैर वनप्रदेशीं
स्वातंत्र्यसौख्यांतिल माधुरीचा
आस्वाद तो होय सुगन्ध हीचा

मी प्राप्तकाळा विसरून गेलों
गतेतिहासांत निमग्न झालों
धालों असा पाहुन रानजाई
अजून डोळ्यांपुढुनी न जाई

———

## पाटिल

( जाति–केशवकरणी )

अबलख वारूवरी बैसुनी येतो हा पाटिल
शिरीं भरजरी खुले मन्दिल
मन्दीलाची कड जरतारी किंचित् मानेवर—
झुकूनी खुलते वरचेवर

गन्धटिळा भाळावर, झुलती कानांमधिं चौकडे
मिशांचे गालांवर आकडे
लाल झांक डोळ्यांत जराशी, हुकमी तोऱ्यावर
बोलतो काढुन करडा स्वर

रमत रमत वेशींत गांवच्या शिरतो मग पाटिल
मण्डळी चपापती तेथिल
' जी जी ' करिती मुजरे, हुजरे सदरे जणुं, वेस्कर
खालतीं लववुनि अपुलें शिर

खबरबात गांवची विचारुन चावडींत पाटिल
हळूं मग टाकितसे पाउल
हुकुम घ्यावया खडे जाहले रामोशी, वेस्कर
पुढें करि कुळकरणी दप्तर

चित्र जुनें गांवच्या धन्याचें दिसलें डोळ्यांपुढें
आज परि काय दृष्टिला पडे ?
या अमदानिंत उरले असती नांवाचे पाटिल
स्वताची त्यां जाणिव कोठिल ?

पिढ्यापिढ्यांतिल बदल असे हा, दोष नसे त्यांकडे
हीच दुरवस्था चोहींकडे
सरकारी अधिकारी यांची मर्जी साम्भाळुन
कसेतरि घालविती ते दिन !

" काळाचा हा ओघ ओळखा, व्हा पाटिल शाहणे
नका करुं हीन आपुलें जिणें
व्हा साक्षर, अधिकारक्षम मग तेच तुम्ही व्हाल कीं
नवी दाखवाल पाटीलकी

मीहि याच वंशांतिल, होते वाडवडिल पाटिल
म्हणुन या जीवाची तळमळ "

# * रोहिणी

( जाति–मञ्जरी )

नेसून रेशमी हिरवी साडी नवी
चालली बालिका कुणी, मना मोहवी
भासते मला ही हुबेहूब मैथिली
जी स्वयंवरा सखिसवें सभे पातली

ही निसर्गकन्या जणूं श्रावणांतली
नेसून नटे कोंवळी हरित् शाद्वली
पालवी नवी ल्याइली बालवल्लरी
उमलली हरित् कोषांत कळी लाजरी !

बाळसें अजुन अङ्गांत, जरा ठेङ्गणी
रेखीव सान पुतळीच अशी देखणी
बाल्यांतुन येते यौवन आरोहुनी
मी तथापि सम्बोधितो हिला ' रोहिणी '

लगबगा निघे आपुल्या माउलीपुढें
चालली रामदर्शना मन्दिराकडे
साजते किती काञ्चनी कटी मेखला !
पाहून हिला पावल्या हर्ष चित्कला

---

* ८–९ वर्षांच्या मुलीस ' रोहिणी ' म्हणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.......... नं..........
ता..............
ठाणें.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं........
ठाणें

## डोम्बाऱ्याचा खेळ

( जाति—भूपति-वैभव )

बडवून ढोलकें ओरडला डोम्बारी
टाकिली दणाणुन पेठ आमुची सारी
मी बघतों जों राहून उभा सज्जांत
ही थाप मुलांची गर्दी भर रस्त्यांत !

'भलभल्या सिरीमन्तास जहागिरदारां
समद्यांस करुन दावतों खेळ मी न्यारा'
बडवून ढोलकें ओरडला डोम्बारी
जोरसें दण्ड ठोकिला, मल्ल जणुं भारी

तें पोर जयाचें शरीर जणुं वेताटी
किति सफाइनें करि कसरत हातावरतीं
थाळींत ठेवुनी पाय, तोल सावरुनी
तें घसरत गेलें खुशाल नाड्यावरुनी

पाङ्धरुनि पिसांची कुञ्ची अङ्गावरुनी
कोम्बडा वने ताम्बडा तुरा हलवोनी
' शाबास् रे पट्ठ्या ! खूप तुझी हुश्शारी '
बडवून ढोलकें ओरडला डोम्बारी

थोरलें कडें त्याचिया भोंवतीं पडलें
बघण्यांत खेळ बाळांचे डोळे गढले
त्या जिज्ञासू डोळ्यांत उभी नवलाई
शाळेचें त्यांना भान राहिलें नाहीं

ऐकून परन्तू कर्कश तो गोङ्गाट
काहूर भरें डोक्यांत माझिया दाट
साहून व्याप रञ्जीस जीव हा आला
पाहून खेळ वाटली न गम्मत त्याला

मी ल्हान असतां असाच कितितरि वेळ
तो पहात होतों डोम्बाऱ्याचा खेळ
मी मनांत अगदीं थक्क होउनी जावें !
स्वप्नांत कितीदां खेळ बघाया जावें !

मज अजुन आठवे कुणखर तो डोम्बारी
शक्तीचें ज्याच्या कौतुक केलें भारी

# रानजाई

मीं बाळपणीं जीं स्मृतिचित्रें रङ्गविलीं
आहेत अजूनहि मनांत माझ्या ठसलीं

स्मरतें कीं असतां तिसरीच्या वर्गांत
उघडून पुस्तकांतला नेमका पाठ
वाचावा कितिदां ' डोम्बाऱ्याचा खेळ '
तें चित्र बसावें पहात कितितरि वेळ !

त्या चित्रांतहि मज वाटत होती मौज
प्रत्यक्ष खेळ बघुनी न रमे मन आज
मी विचार बसलों करीत तिकडे दारीं
बडवून ढोलकें ओरडला डोम्बारी

## शेवन्ती

( जाति–अवनी )

शेवन्ती, तुज केंव्हां पाहिन या डोळां ?
स्मरणिं अजुनि मूर्ति असे तव मराठमोळा ॥ धृ० ॥

तव नाजुक अङ्गकान्ति,
फुलली जणुं शेवन्ती,
खुलवी किति कुन्ददान्ति
तळि तव कपोला !

लीनपणें हळुं वदणें,
गालीं मधु खळि पडणें,
खालीं स्थिर पदिं बघणें
करिशि मुग्ध लीला

पदर नीट डोईवर,
मन्द चरणगति सुन्दर,
वळण तुझें फार मधुर
खचित तूं सुशीला

रीत तुझी किति निर्मळ !
हाकेला ‘ जी ’ मञ्जुळ,
मर्जि राखण्यांत कुशल
तव स्वभाव भोळा

दिन गेले किति निघून !
भगिनि विनयवति अजून
भेट न ये तव घडून
जीव हो भुकेला

कधिं बसतां एकान्तीं
दिसते मज तव आकृति
आठवणी गोड किती
होती मनिं गोळा !

‘ वेलीवर जेविं फूल
तव कटीस तेविं मूल ’
वत्सल हें चित्र भूल
पाडितें मनाला

## सहधर्मिणीस

( वृत्त–शा. वि. )

‘ तूं माझी सहधर्मिणी इह जनीं झालीस ’ ही योजना—
देवाची; असतील कांहिं जुळल्या जन्मान्तरींच्या खुणा;
त्यानें कायम जन्मगांठ अपुली घालून आहे दिली
काळावांचुन कोण शक्त जगतीं गे ती कराया ढिली ?
भार्या तूं मज लाभलीस अगदीं माझ्या मनासारखी
भावी जीवित निश्चयें निज गडे होणार वाटे सुखी
वृत्ती उल्हसित, स्वभाव तव गे पाहून साधासुधा
माझें सार्थक जाहलें, मज गमे स्वर्गीय लाधे सुधा
आतां आमुचिया घरांत कमला प्रत्यक्ष आली असे
आतां सर्व लहानथोर दिसती आनन्दलेले कसे !
चर्या तासिक आणि खिन्न मम ही झाली प्रफुल्ला अतां
हा तूझाच असे प्रभाव, तुज कां मानूं नये देवता ?
‘ प्रीती आणिक चारुता मिळुन हा संसार व्हावा सुखी
व्हावा वर्धित हर्ष, नित्य कविता यावी बहारास कीं ’
आशेच्या सगळ्या कळ्या बघ अशा चित्तीं फुलूं लागल्या
माझें ईप्सित लाभणार म्हणुनी चिद्वृत्ति झाल्या खुल्या
मी आहेत मनांत गोड रचिले सङ्कल्प ते सिद्धिला—
नेऊं आपण, देऊं तोष पितरां, ध्याऊं प्रभूमूर्तिला
त्याची पांखर आपणांवर असे, देईल तो प्रेरणा,
त्यांहीं आपुलिया मनोहरपणा येईल गे जीवना

## गे हास हास ! (वृत्त—वसन्ततिलका)

गे हास हास ! तव सुन्दर गौरवर्ण
तेणें किती तुज गडे दिसतो खुलून !
तूं हासतां उपजतो मनिं गोड भास
कीं चान्दणेंच शशिचें उजळी नभास !

कीं चन्द्र बिम्बुनि जळांत खळेंच होई !
होई प्रफुल्ल अथवा निमिषांत जाई !
आल्हाद देत अथवा खुलते हवाई !
हास्यामधील तव काय कथूं नवाई ?

हा हासरा वदनचन्द्र तुझा बघून
येतो अहा ! हृदयासिन्धु उचम्बळून
ही दन्तपङ्क्ति तव सुन्दर, नीळ डोळे
ह्यांतून हर्ष जणुं मूर्त भरून डोले

ह्या जेथ हर्षलहरी उठतात लोल
तें का मला हृदय दाखविशील ? बोल.

---

## मान्दिल

( जाति–पर्वती )

पाहुनी शिरीं मन्दिल
किति खुलें जाहलें दिल !
हा अजून दावी बाणा निज कोठला वेरें पाटिल !

जरतारीच्या झिरमिळ्या
भिंगबाळीवर लोम्बल्या
लखलख करुनी हवेमधूनी उडति कधीं मोकळ्या

किति कपाळपट्टीवरी
शोभे ती फक्कड निरी
रुन्द तीवरी पट्टा खुलतो लालभडक कितितरी !

अशि डौलदार बान्धणी !
हा मान्दिल बघतांक्षणीं
मला मराठेशाहि आठवे जिचा शिवाजी धनी.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ............
ठाणे.

## निशीथ–गायक

(जाति–प्रणयप्रभा)

कोकिळा मोकळा करुनि गळा
कां व्यर्थ दवडिशी गानकळा ? ॥ धृ० ॥

मोहर फुटला आम्बराइला
मधुर कण्ठ तों तुजला फुटला
परन्तु सन्तत गाणें, कुठला–
हा न्याय ? मळा गमतोस खुळा

कोमल पल्लवयुत तरुशाखा
तिजवर बसुनी एकसारखा
घेसी मधुरालाप असा कां ?
तूं नादी, तिळ न उसन्त तुला

चारणगीतें प्रभातसमयीं
रवीस ललकारति खगगवई
गाई भैरव सुरेल सनई
ती मङ्गल वेळा उचित तुला !

शिणुन चराचर झोपीं गेले
शान्त निशासाम्राज्य पसरलें
अजुन कां न तव गायन सरलें ?
का भुलवी वरिल महाल निळा ?

" अहा ! किती ही दिसे मनोहर !
लावण्यें निज उजळी अम्बर
विकसित झालें माझें अन्तर
मम सुन्दर राणी इन्दुकला !
हृदयींच्या माझ्या खुलवि कळा ! "

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ५११८२
(ठाणे शाखा)

## बाल–स्वभाव

( जाति–श्यामा राणी )

जननी–वक्षीं शिर ठेवोनी
कटिस कितीदां कवटाळोनी
रडे स्फुन्दुनी बालक कोणी
जननी–नयनीं । अश्रु येउनी । सङ्गम झाला छान

गहिंवर आला दाटुनि चित्तीं
बाळाचें मुख कुरवाळी ती
‘ उगा उगा ’ वच आले कण्ठीं
‘ कुणी मारिलें । काय जाहलें ? । साङ्ग सोनुल्या साङ्ग ’

‘ किनइ ताइनें चिलवायाला
साङ्गितलें त्या दादिटल्याला
मालमालिलें त्यानें मदला
नामनिलाली । ताइ लाहिली । तीही भाली द्वाल ’

‘ एवढेंच ना ? थाम्ब तयाला
देत्यें छडिचा मार चाङ्गला
गोड खाउ परि देइन तुजला ’
हातामाजीं । दिली करञ्जी । उगें जाहलें बाळ

नाचत गेलें दादाजवळीं
खात खात दावून वाकुली
म्हणे, ‘ तुला कुठें ही असली ?
आई येउन । खाऊ देइल । धम्मकलादू छान ! ’

क्षणांत रडवी, क्षणांत हंसरी
बाळमूर्ति ही अशी गोजिरी
डोळे भरुनी कितीकदां तरि
पाहुन घ्यावी । गाणीं गावीं । साठवुनी काव्यांत

## छत्रपति सम्भाजी

( वृत्त–शा. वि. )

झालें छत्रपतींचिया पदरजें जें पूत सिंहासन
सम्भाजी, मदिरेंत तूं बुडविलें हें केवढें लाञ्छन !
कब्जी मान्त्रिक धूर्त दुर्बळ तुझा मन्त्री; गळा आपला–
केला स्वाधिन त्याचिया, न दिसला सिंहा तुला सापळा !

मातृप्राणविहङ्गमास अधमा तूं मारिलें कोण्डुनी
उन्मत्त भ्रमरा, कुलीन कमला अव्हेरिली चुम्बुनी
रायाचीं नरमौक्तिकें चिरडिलीं, साम्राज्यसूत्रें ढिलीं–
केलीं, माजविलीं तुवां निज महाराष्ट्रामधें बेदिली

देई ताप जनां तुझें चरित हें माध्याह्नसूर्यापरी
झाला संस्मरणीय अस्तहि तुझा राष्ट्रेतिहासीं परी
वीरा, ही वदलास गर्जुनि गिरा त्या धर्मवेड्यापुढें
' आम्हां धर्मच मोक्ष त्यास्तव पडो प्राणांवरी सांकडें '

झाला देह विछिन्न, जाय निघुनी आत्मा यमा जिङ्कुनी
या दिव्यें कुळकीर्ति तूं उजळिली हे धर्मवीराग्रणी !

---

## सदाफुली व शेवन्ती ( वृत्त–शा. वि. )

उद्यानीं फुलली सदाफुलि, नसें सौन्दर्य पुष्पां जरी
नाहीं येत सुगन्धही, तरि तयां ती लोटिते कां दुरी ?
ताटातूट न साहती, बिलगुनी बाळें तिला राहती
' त्यांना कां दुखवा ' असें गमुनिया कोणी न त्या तोडिती

' माझीं हीं छकुलीं गुणी किति तरी !' हर्षें वदे ती मनीं
आईला अपुलीं मुलें मज कधीं झालीं नकोशीं कधीं ?
शेजारीं पिवळी असे बहरली पुष्पीं तशी शेवती
तीचा चोहिकडे सुगन्ध पसरे, बाळें तिचीं देखणीं

हर्षें तीहि असेल बोलत मनीं, " माझीं गुणी सोनुलीं
यांची कोण सरी करील जगतीं ? लागेल यां दृष्टही "
आली तोंच तिच्यासमीप युवती, पुष्पें तिचीं तोडिलीं
मातेपासुन घेतसूं हिरवुनी बाळें अशीं प्रत्यहीं

नेतो देवहि यापरी स्वसदना बाळें गुणीं देखणीं
देवाच्या घरचाच न्याय, मग कां ठेवील नांवें कुणी ?

---

## ईश्वराचें वात्सल्य

(छन्द–अभङ्ग)

भावण्ड हें माझें पोर हूडबुद्धि
सदा करी खोडी–हट्ट घेई
त्याचा तो स्वभाव मला वाटे गुन्हा
रागें पुन्हा पुन्हा–बोललों त्या

आले त्याचे डोळे पाण्यानें भरून
स्फुन्दून स्फुन्दून–गेलें झोंपी
झोंपेंत उसासे टाकी, ओठ काढी
दचकून कधीं–जागें होई

रडवें वदन बाळाचें पाहूनी
माझिया लोचनीं–अश्रू आले
कितीदां कितीदां गेलों त्याजपाशीं
चुम्बीलें तयासी–कितीदां मी !

दाटल्या कण्ठानें म्हणालों मी ‘ बाळा,
राग नाहीं तुला भरणार ’
गाळिलीं आसवें, हात जोडुनीया
मनीं देवराया—चिन्तिला मी

काय साङ्गू आले विचार जे मनीं
जाय पस्तावुनी—मति त्यानें
“ नाहीं मी का प्रभो, तुझें हूड पोर
सदा अगोचर,—खोडकर ?

पदोपदीं तुझ्या खोड्या मी करितों
तुजला सोडितों—भण्डावूनी
मीच क़ाय, सारे लोक हीं लेंकरें
किती आज्ञा बरें—पाळतात ?

किती वेळ आम्हां रागें भरलासी
कितीदां आम्हांसी—शासिलेस ? ”
येऊन हें मनीं गेलों भाम्बावून
मिटले लोचन—आपोआप

म्हणालों एवढें, “ दयासिन्धो तात
वात्सल्यास अन्त—नाहीं तुझ्या ’

## कां मीच—

(वृत्त–वसन्ततिलका)

वृक्षावरी बसुनि कोकिळ मञ्जु गाई
चण्डोल भेदुनि नभा शरसाच जाई
रावा बसूनि विटपीं फळ गोड खाई
कां मीच पञ्जर-खगापरि दीनवाणी ?

स्वच्छन्द हा पवनही बघ डोलताहे
हा बाळ निर्झर कसा झुळझूळ वाहे
फो फो करीत सरिता पुढतीं निघे ही
कां मीच पञ्जर-खगापरि दीनवाणी ?

हा मेघ हिण्डत असे गगनीं खुशाल
झाकून टाकि सहजीं रवि-रश्मि-जाल
हा सिंह गर्जुनि करी भयभीत प्राणी
कां मीच पञ्जर-खगापरि दीनवाणी ?

हा शीत इन्दु हरुनी रवितापं पूर्ण
होई नभीं रजनिकान्त विराजमान
तारा तशा विलसती गगनीं हसूनी
कां मीच पञ्जर-खगापरि दीनवाणी ?

मेघात्मजा चपल ही चपला झळाळे
नागीण साच, जणुं नाच तिचाच चाले
हासे प्रसन्न रमणीय निसर्ग पाही
कां मीच पञ्जर-खगापरि दीनवाणी ?

## माझी धाकटी बहीण कमल (वृत्त–शा. वि.)

मी अद्यापि न धाकट्या बहिणिला कां गीत हो गाइलें ?
जीयोगें गृह हें खऱ्या गृहपदा सम्पूर्ण पोहोंचलें
लीला गोड हिच्या कशा न दिसल्या या काव्यदेवीप्रति ?
ज्या आम्हां गत अर्भक-स्मृति मनीं होऊं न देती कधीं

नाहीं फूल कुठेंहि वेलिवरतीं–उद्यान नाहींच तें
नाहीं मूल जयांत राङ्गत कुठें–नाहीं तसें गेह तें
जेंव्हां तूं कमले प्रभात पहिली विश्वांत या पाहिली
हर्षाची इकडे प्रभात अपुल्या गेहीं तशी जाहली

काळानें झड घालुनी निजगृहा माईस नेलें जधीं
सर्वांचीं मिटलीं सुमांसम मनें शोकातिरेकामधीं
माङ्गल्यांत मनःसुमें उमललीं त्वज्जन्मसूर्योदयीं
होता त्या समयास भास्कर जरी आकाशमध्यावरी

चित्ता हर्षच देइ जन्मसमयीं केलेंस जें रोदन
झालें रोदन हर्षदायक अम्हां आश्चर्य हें काय न ?
आम्हां टाकुनि बन्धु आणि भगिनी गेल्या अकालीं तयीं–
अस्मच्छोक-निवारणीं प्रभुकडे केली तुझी मागणी !

देवाच्याहि मनांत ये कळवळा, धाडून तूतें दिलें
त्यांचें मोहक एकरूपपण गे देहीं तुझ्या सांठलें
आलीं एकवटून का तव मनीं त्यांचीं जुनीं वाञ्छितें ?
देवो ईश्वर दीर्घ आयु तुजला, न्यायास तीं पूर्णते

## शाळूच्या शेतांतील शेतकरी

( जाति-दोहा )

हौसेनें काम कराया शाळूच्या शेतांत
घारकंड्यावरुनी खालीं भुतें कधीं येतात.
मोत्यांच्या कणसांवरतीं पडें चान्द्णें शान्त
विळे सपासप चालवुनी वेटाळणि करितात !
आरवतो रामपहारीं शेतकऱ्यांचा भाट
तींही मग एकाएकी नाहींशीं होतात

१ एक डोङ्गर; २ कापणी.

कारभारी गांवांतिल ते भले जहागिरदार
पाहोनी मिटती डोळे कर्ते नातू चार
कामाला कणखर भारी कष्टाळू ते राव
म्हातारे होउन गेले मागें ठेवुनि नांव
मोटेवर गाई गाणीं, बाळा तो दिलदार
कितिक असे गेले ज्यांस्तव गांव हळहळे फार

भुतें होउनी मेण्ढ्यांचा करिती ते प्रतिपाळ
नाङ्गरतीं शेतें धरुनी नाङ्गर ज्यांस न फाळ
गोठ्यांतिल त्यांच्यापैकीं गाई कुणि दोहील
कोणी तर इकडे तिकडे न्याहाळुन पाहील
गूढ आणि अश्रुत ऐसें गाणें घालुनि शीळ
एकादा शौकी कोणी गाइल त्यांच्यांतील

चन्द्र ढळे माथ्यावरुनी, जाय हळूं अस्तास
पहाटचा वारा उठवी जगास निद्रिस्तास
शाळूच्या शेतामधले शेतकरी गुपचूप
धारकड्यावरती जाती कष्टी होउनि खूप
राखणवाल्या खण्ड्याला ये खडबडुनी जाग
बघतो तों कोठें नच त्या शेतकऱ्यांचा माग !

---

## वत्सलता

( जाति–साकी )

त्या बाळानें फुलें तोडिलीं भरभर फुलवेलीचीं
हवेंत दिधलीं उधळुन, केली दशादशा हो त्यांची !
‘ दे भाऊ दे त्यांतिल कांहीं ’ बोलत आली ताई
चोळामोळा केला, परि तिज दिलें एकही नाहीं
नवल खरोखर ! त्या वेलीला रागहि नाहीं आला
कारण वारा सुटून खालीं सडा फुलांचा झाला

त्या तरुणानें फुलें लतेचीं खुडिलीं सुन्दर ताजीं
विसरुन गेला भान तयांच्या मधुर सुगन्धामाजीं
तोंच जाहली स्मृति प्रियेची, फुलें वेंचिलीं कांहीं
गजऱ्यासाठीं निवडक त्यांतिल घरास घेउन जाई
सुमनमिषानें तोंच ढाळिले आनन्दाश्रु लतेनें
‘ वंशलता तव अशीच फुलुं दे ’ या मङ्गल भावानें

त्या वृद्धानें जपून खुडिलीं फुलें लतेचीं चार
हात न वाहे अधिक खुडाया कम्पित झाला फार
वत्सल वेली, कोमल बाळें सभोंवार तो पाही
भावभक्तिनें तींच फुलें मग देवपदांवर वाही
हर्षभरानें उधळित सुमनें त्यास लता वर देई
‘ फुलबाळांसम प्रभुच्या सन्निध तूंहि निरामय राही ’

पुष्पलता ही नसे खरोखर वत्सलता ही मूर्त
स्त्रीजातीला सार्थ शोभते वत्सलतेची कीर्त

## भिकाऱ्याचा पोर

(:जाति–गोविन्द)

मळकट बण्डी, जुनापुराणा अङ्गामध्यें कोट
टोपी डोईवरी फाटकी, कमरेला लङ्गोट
पहा अशा थाटांत चालला कुणी भिकारी पोर
भिक्षा मागत, करीत गम्मत, हासत थट्टेखोर
केव्हां दुडक्या चाली चाले करुनि वाकडी मान
डोळे मिचकावीत मजेनें, रस्ता धुण्डित घाण
नाक कधीं फेन्दारुन दावी वाकोल्या पोरांस
दात काढुनी हसतो केव्हां म्हणतो 'वा ! शाबास ! !'
पेणसलीचा तुकडा किंवा फुटकी कवडी कांच
दृष्टिस पडतां उचलुन घेतो, नाद तयाला हाच
कानठळी बसवील अशी तो कधीं वाजवी शीट
भग् भग् चाले करीत नक्कल आगगाडिची नीट
'आला खण्डाळ्याचा घाट, तेथें गाडी झाली दाट'
म्हणतो ही लावणी मुलांच्या परिचयांतिल दाट
विदूषकापरि कधीं चेहरा बदली अगदीं साफ
लाज जनाची, लाज मनाची सारी त्याला माफ
गरीबिची जाणीव न होई स्वप्नीं देखिल ज्यास
कशी काळजी शिवेल मग त्या आनन्दी आत्म्यास !
बेफिकिरी वृत्तिची सदा गाण्यास जयाच्या साथ
नन्दनवनिंच्या सुखावरहि तो मारिल कां नच लाथ !

## मोहरलेल्या आम्रवृक्षास उद्देशून (जाति—वसन्ततिलका)

आम्रा, अहा ! अखिल वृक्षकुलावतंसा
गोधूमवर्ण तव मोहर हा बघून
हो लोचनांस सुख, भावतरङ्ग नाना
येतात साम्प्रत मनांत उचम्बळून

तूं भासतोस मज ‘ भारत-कल्पवृक्ष ’
या देवभूमिवर तूं असतां समक्ष
तूझें गुणस्तवन सोडुन, कल्पनेनें—
वर्णीन कां वितथ कल्पित कल्पवृक्ष ?

राजर्षि हा ‘ शिशिर ’ झाडुनि जीर्ण पर्णें
वृक्षांस निर्मळ करी, नव पालवींनीं—
व्हाया विभूषित; महन्त निजोपदेशें
जैसा विनष्ट करि जीर्ण मतें जनांचीं



३

पाळावया व्रत महाशिवरात्रिचें हा
वाहीं तुझा शिशिर मोहर शम्भु-शीर्षीं
जातो निघून; ' ऋतुराज वसन्त याचा—
होवो शुभागम ' अशी वितरून आशी

देवालयीं दरवळून तरङ्गणाऱ्या
धूपापरी तव मनोहर मञ्जरींचा
वाऱ्यावरी घमघमाट सुटून येतो
घ्राणेन्द्रियास मम सौख्य अपार देतो

प्राशून पेय अति मादक, गोड गुङ्गी
यावी; तसे नयन तारवटून जावे !
भोगावया मज मनोज्ञ अशी अवस्था
लाधे तुझ्या मधु सुगन्धगुण--प्रभावें

एकेक या तव सुवासिक मञ्जरींत
आकण्ठ कुम्भ भरले असती सुधेचे
अदृश्य साम्प्रत, तथापि यथावकाशें
नेत्रांस दर्शन सुरम्य घडेल त्यांचें

ते शेन्दरे, हरित, पीत असे सुरङ्गी
अत्यन्त अन्तर यदीय रसाळ नामी
प्राशीन ते अमृत--कुम्भ यथेच्छ केव्हां ?
मानीन तुच्छ सुरलोक-सुधा कदा मी ?

खारी हवा सुटुन रुक्ष भुरे पयोद
व्योमीं जमून रवि-बिम्बहि झांकतील
चोंहीकडे फिकट खिन्न पडेल ऊन
येईल रे अवकळा अवनीस तेव्हां !

जाईल मोहर गळून तुझा अपाप,
मागें उरेल अवशेष; परी निराश—
व्हावें न तूं, बहर हा जरि थोडकाच
आणील रम्य परिपक्व दशा फळांस

कालान्तरें सहज होशिल तूं उदास
होतो परी तुजसमान उदास मीही
चित्तांत या मम असङ्ख्य विचार येती
थोडे किती ग्रथित या कवनांत होती !

देशामधें कधिं भयङ्कर सांथ येते
तेंव्हां उडे कहर सर्व जनांत घोर !
आम्रा तुझा झडुन मोहर जाय, तैसे
हा ! हा ! बळी पडति मृत्युस सानथोर ! !

दुष्काळ, सांथ, परचक्र, अनर्थ, घात
यांचे जगीं सतत येति घडून पात
ज्या ' सर्वभक्षि ' म्हणुनी जग ओळखीतें
तो काळ हे सकळ धाडुन देइ दूत

आम्रा, असे प्रतिथ विश्वविनाश-तत्त्व
साङ्गून मी शिव शिव ! स्वमनोविकार—
केले उदासिन; परी मनुज-स्वभाव
पाहे स्थितींत सुखपूर्ण, अनर्थ घोर !

माझे तुझे समसमान बघून धर्म
सम्बोधितों तुजसि मीहि ‘ कवी ’ म्हणूनी
होतांच तो ऋतु वसन्त विराजमान
गाशील कोकिळमिषें अति गोड गाणीं

गातोस तूं परि अलौकिक ‘ विश्वगान ’
तत्तुल्य हीं न दुबळीं कवनें मदीय
तत्रापि मोहर तुझा बघुनी सुवर्ण
हो प्रेरणा मजसि हें रचण्यास काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठाणे

## सान्त्वन

(वृत्त—रसना)

“ फुलली कळी सकाळीं आलीं गळून खालीं
परि गन्ध-मोहिनी का कोठें मलूल झाली ?

करिती विलोल तारा काळीं तिन्ही विहारा
जरि ना दिसे पसारा दिवसां निळ्या महालीं !

गालीं उषा नहाली कालें फिकी जहाली
प्रमदे, तुझी नव्हाळी कैशी म्हणूं निमाली ?

सौन्दर्य-गन्धवीची जीवन्त गे सदाची
त्या क्रूर कायद्याची हृदया स्मृती न जाळी

कान्ते विलासिनी ये सहचारिणी प्रिये ये
मत्प्रीति-जिन्दगी गे केली तुझ्या हवाली

हा चन्द्रमा विलासी माझ्या गमे मनासी
गाण्यास वेळ खाशी साकी गझल् कवाली

प्रेमामृतास वर्षी बुडवी मनास हर्षी
आहेच दूर भारी कल्पान्त रात काळी

अवघीं फुलें महीचीं अवघीं फुलें नभींचीं
नेईल तो खुडोनी माळी प्रभावशाली ”

## ' सृष्टि दिसे नवबाला ' (जाति–रेवती)

सृष्टि दिसे नवबाला । कान्ते ॥ ध्रु० ॥

वर्षाऋतुनें हिला अर्पिला
हिरवळिचा मृदु शेला । कान्ते

हिरव्या वेषीं नटुनि जशी तूं
देशी हर्ष मनाला । कान्ते

आज समसमा जणुं दोघींचा
सङ्गम घडुनी आला ! । कान्ते

अनुपम शोभा पाहुनि तुमची
जीव अतीशय धाला । कान्ते

रूप कसें किति साठवुं तुमचें
इवल्याशा या डोळां । कान्ते

ही तनुवरती अक्षय नवती
देवो देव तुम्हांला । कान्ते

मीहि जन्मभर पाहिन तुमचा
हिरवा हा सोहाळा । कान्ते

सङ्गें तुमच्या करील लीला
कविता मम वेल्हाळा । कान्ते

## तान्हुल्याचा मुका (जाति–प्रणयप्रभा)

विसरलों घ्यावया तुझा मुका
तान्हुल्या राहिला जीव भुका ॥ ध्रु० ॥

उभी राहिली गाडी दारीं
हाक कुणी मज आंतुन मारी
गडबड धान्दल झाली सारी
मज घेउन गेली परमुलुखा

कोठडीमधें तो बन्दीजन
ध्यास धरोनी करितो चिन्तन
तसें इथें एकलकोण्डें मन
घडिघडी आठवी तुझ्या मुखा

तुझें हासणें, तुझें खिदळणें
कधीं मजेनें मुठीं चोखणें
चिमण्यांवरि टक कधीं लावणें
किति अशा आठवूं तुझ्या सुखां ?

एक दिनीं मी जाइन सदना
डोळा भरुनी पाहिन चिमणा
मुका घेउनी हसविन तान्हा
मी अधिर असे झालों इतुका !

हाय परी हे चिमण्या राजा
हिरमोड किती केला माझा !
झालास अतां तूं देवाचा
मी कायमचा यापुढें मुका !

---

## सृष्टीचें गायन

( वृत्त–उपजाति )

सृष्टी गमे, सन्तत गीत गाते
चराचरां गाउन रञ्जवीते
वसन्त गेला फुलवून रानें
गाऊन गेला पिक गोड गाणें

वारा पुढें धाडुन दूत आला
बसून मेघावरि पावसाळा
दृष्टी नभीं लावुनि ‘ पावशा ’ हो
‘ या हो ! ’ असा फोडित एक टाहो

‘ नक्षत्र लागे मृग ’ आणिली ही
आनन्द–वार्ता मृगकीटकांहीं
महीवरी येति सरी झरारा
विद्युत् नभाला बसवी दरारा

हे नाकतोडे सुरवण्ट, टोळ
तृणांतुनी सञ्चरती खुशाल
इथें तिथें हा झुकतो ‘ चतूर ’
जातां धरूं जाइ उडून दूर

विचित्र नाना फुलपांखरें हीं
बागेमधें बागडतात पाहीं
वेलींचिया पल्लव-पुष्प-पुञ्जीं
भुङ्गे गडी घालति गोड गुञ्जीं

पिकें फुलोऱ्यावरि जों न येती
तों जाहली सावध पक्षिजाति
थवे निघाले मधुमक्षिकांचे
पोळें पहा सुन्दर हें मधाचें

वळीव केंव्हां झडपी पिकांस
लहान रोपें मिळतीं धुळीस,
जातात तों मेघ निघून वेगें
माळावरी ऊनहि राङ्गु लागे

उभारतीं जीव धरून शेतें
सारी तदा कीटक-सृष्टि गाते
तीं किर्र त्यांचीं परिसून गाणीं
वाटे फुटे या धरणीस वाणी

स्थळीं स्थळीं मण्डुक पल्वलांत
ध्वनी अती कर्कश काढतात
परन्तु या बेसुर गायनांत
गढून जाते धरणी नितान्त

खळाळुनी ओहळ वाहतात
गाई गुरें हम्बरतीं मळ्यांत
हवेमधें गोफणिचे ‘ भिरीरी ! ’
‘हा हा ! ’ असे गुङ्गाति नाद भारी

खळ्यामधें शेतकरी मजेनें
साधें परी गाइ सुरेल गाणें
हें सृष्टिचें गायन ऐकण्याला
शेतावरी जाउं फिरावयाला

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
स्थळ प्रत
स. ........ नं. ........
ता. ........

## गडे तूं— ( जाति–मनी )

गडे तूं आनन्दी पांखरूं
खरोखर आनन्दी पांखरूं ॥ धृ० ॥

हसणारें तूं असशीं केवळ हर्षाचें लेंकरूं
चिन्ता तुजला ठाउक नाहीं
बेफिकीर किति वृत्ति तुझी ही
इकडुन तिकडे, तिकडुन इकडे बागडतें कोंकरूं

क्षणभर मजला निरखुन बघशीं
मधेंच केव्हां खुदकन् हसशीं
साङ्ग, अल्लडे तुझी सङ्गती कां न गडे मी धरूं ?

हळूंच पाठीमागुन येउन
झाकितेस तूं माझे लोचन
मधु भावांचे झरे मानसीं लागतात पाझरूं

केंव्हां तूं चिमुकलेंच चुम्बन
देउन चटकन जाशीं निसटुन
चञ्चल वृत्ती बघुनि विजेनें कां नच हेवा करूं ?

स्वभाव तव हा अमृत-मेळा
मलाच मिळतो सेवायाला
तूंच फुलोऱ्यावरी आणिला माझा जीवन-तरू
गडे तूं आनन्दी पांखरूं

## जिवलगेच्या हृदयासाठीं (जाति—केशवकरणी)

तव हृदयाच्या प्राप्तिस्तव मी खर्चिन सगळीं जगें
हृदय पण हवें तुझें जिवलगे
सूर्यफूल देईन तोडुनी गगनोद्यानांतिल
हृदय पण हवें तुझें प्रेमळ

हवा तुला तर आणुन देइन शीतल शशि-मञ्चक
घेउं चल गाढालिङ्गन-सुख
गुलाल आणिन हवा तेवढा तुजसि उषेपासुन
खेळुं मग रङ्ग रङ्ग आपण

रविस पदच्युत करून बसविन तुज अरुणाच्या रथीं
तुझा मी होइन मग सारथी
सप्तरङ्गि तुज इन्द्रधनू मी कङ्कण देइन नव
छन्द हा पुरा करिन मी तव

हव्या तेवढ्या आणुन देइन तारा तुज अगणित
गजरा खोव करुनि वेणींत
स्वर्गङ्गेमधिं विहार-वाञ्छा असेल तुजला तर
जाउं चल, दूर नसें अम्बर

धूमकेतुचा थोर फवारा हवा शिरावर तुरा
तोहि तुज देइन करुनी त्वरा
वियोग होइल कधीं न असलें हवेंच अढळ स्थळ
ध्रुवावर जाउन राहूं चल

## ‘ हिङ्गणी ’ एक ओसाड खेडें (जाति–मञ्जरी)

ओसाड पडिक त्या खेड्यांतुन हिण्डलों
पाहून अवदशा मनीं फार कष्टलों
भङ्गली वेस अन् गांवकूस कोसळें
जाहलीं ओस राउळें, घरें, देवळें

कुणि ‘ पवार ’ नामें उदार संस्थानिक
हा इनाम त्याचा गांव असा लौकिक !
भुइकोट तयाचा वाडा भक्कम भला
तो अजून दावी निज विभवाची कळा

जीं पराक्रमी सरदार घराणीं जुनीं
सत्पुरुष स्वातन्त्र्याचे झाले धनी
शिवबासह ज्यांनीं राष्ट्रकार्य साधिलें
दिल्लीस कैकदां शह ज्यांनीं बसविले

स्मारकें तयांचीं जिवन्त हीं एवढीं
बावडी, दुर्ग, देवळें, हवेल्या, गढी
मावळे मऱ्हाठेशाहीचा भास्कर
अन्धार मातला पूर्ववैभवावर

निज इतिहासाची आवड धरुनी मनीं
जिज्ञासू बनुनी बघूं स्मारकें जुनीं
धनदौलत त्यांची कलाप्रीति, दानत
ही खेडेगांवांतून फिरूं पाहत

हतवैभव धनिकापरी गांव हा झुरे
जनवसतीवांचुन भकास दिसतीं घरें
मजसमान कोणी भेटतांच पाहुणा
दावितो त्यास निज ऐश्वर्याच्या खुणा

हा जीर्ण जनक जाहला जराजर्जर
गणगोत न जवळीं सेवेला तत्पर
मायेचीं त्याचीं मुलें त्यास सोडुनी
तीं पोटासाठीं गेलीं देशोधडीं

खेड्यांतुन आलों आपण सारेजण
सुत आपण त्याचें ठेउन मागें ऋण
फेडल्यावांचुनी तें न कुणा सद्गती
अवलोका भेटुन त्याची हीन स्थिति

पूर्वजक्षेत्र तें, जन्मभूमि आपुली,
आपुल्या वाडवडिलांस तिची साउली !
दर्शनें तिच्या गहिंवरून येइल मन
स्मृतिचित्रें मागिल पाहतील लोचन

भासेल सुसंस्कृत नागर चित्तास ती
रमणीय आणि हृदयङ्गम पूर्वस्थिति

## कल्पिलेला कल्पान्त — [ वृत्त— शा. वि· ]

तातानें लिहिलीं सुबोध वचनें भिन्तीवरी तेथल्या
चित्रें रङ्गविलीं, तशाच कविता मी तेथ आलेखिल्या
ताईनें स्वकरें सुरेख विविधा रङ्गाकृती काढिल्या
बाळानेंहि बघून हें चिमकुल्या रेषा तिथें ओढिल्या

आला घेउन कुञ्चली नर कुणी, त्यानें सफेती दिली—
भिन्तीला, मग आमुची सकलही कारागिरी लोपली
योग्याची मति निर्विकार, गमली ती भिन्त तैशी मला
सृष्टीचा पट दृश्यमान मजला ठायीं तिच्या जाहला

सिन्धू, शैल, जलप्रपात, तटिनी, विस्तीर्ण तें सैकत
रम्य द्वीप, दरी, भयाण विपिनें, ज्वालामुखी पर्वत,
निर्मी हे विधि भूपटीं; उपवनें, प्रासाद, देवालयें,
लेणीं, स्तूप, विहार, दुर्ग, नगरें हीं निर्मिलीं मानवें.

हातीं घेउन काळपूरुष मला तो आपला कुञ्चला
हें टाकील पुसून, पाण्डुरकळा येईल या पृथ्विला.

---

## नैराश्य !

( वृत्त–शा. वि. )

न्याया अन्तरिंचा हुरूप हरुनी हे पातले दुर्दिन
वेळीं सावध राहिलों न म्हणुनी पस्तावतें मन्मन
नाना तर्कविचार घोर करिती काहूर चित्तामधीं
मज्जातन्तु ढिले पडून बनलों मी हा असा मन्दधी

हें जाणार कधीं प्रभो निवटुनी माझें अपेशी जिणें
माण्डी हें छळवाद चक्र शनिचें आतां कधीं थाम्बणें ?
मृत्यूहून अतीव भीषण असा माजे मनीं गोन्धळ
आधीं जीवित रुक्ष सैकत, तिथें झालें अतां वादळ

द्या हो आणुन पेय सत्वर मला प्राशावया मादक
गुङ्गी येउन मी पडेन, छळ हा होणें नको नाहक !
तो हुङ्गून मृणालगन्ध पडले झिङ्गून निश्चेष्टित
योद्धे ग्रीक युलीससादि कमलद्वीपांत ज्या अद्भुत

हो नष्ट स्मृति, कष्टशून्य बनलें त्यांचें तिथें जीवित
त्या द्वीपांत रहावयास अधुना मी होय उत्कण्ठित

## अखेरची तळमळ !

( जाति-साकी )

पूर्णोल्हासें रम्य तुझें मुख जयांत हासे डोळे
सरोवरीं जणुं शशीच ते मम निश्चळ होतिल डोळे

जिनें प्रत्यहीं तुला वाहिली नव सम्बोधन-माला
मुग्ध पुढें ती सदैव राहिल वाणी चतुरा बाला

श्रवणीं येती तुझे तरङ्गत मञ्जुळ मधुरालाप
त्यांचीं हरहर ! मिटतिल आतां दारें आपोआप

तुझ्या प्रीतिचें झुळझुळ वारें जेथें उडवि फवारे
फुलबागांचे जिथें माण्डिले मदनें गोड पसारे

शिर टेकुनि तुज मन्दान्दोळीं जेथें आली झोप
श्वासहीन तें हृदय सखे मम होइल गे निष्कम्प

इन्द्रधनूनें घनास तैसे गजऱ्यानें वेणीला
शोभविले ते लुळे होउनी पडतिल हात उद्याला

अशीच माझ्या आयुष्याची होइल हाय ! समाप्ति
आत्मा माझा मागें राहिल हिण्डत तुझियाभंवतीं

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ सं. ........
ता. ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५१४२

## सदा येती कैसे— (वृत्त–शिखरिणी)

तुझ्या भार्ये चर्येवरतिं सुमनोद्यान फुललें
परन्तू चिन्तांचें मम वदनिं जाळें पसरलें
तुझ्या चित्तीं शान्ती, तनुवरतिं कान्ती विकसली
हृदीं माझ्या आधी भडकुनि तनू होरपळली

मदें तारुण्याच्या असासि सखये तूं गजगती
परी पोटार्थी मी भटकत फिरे नित्य जगतीं
प्रिये, स्वप्नींही तूं रमाशि नव शृङ्गार-भवनीं
न लागे डोळा गे तळमळत मी मात्र शयनीं

तुला हा साधाही रुचकर गमे अन्न-कवळ
परी होतो, माझ्या वदनिं पडतां तोच गरळ
असा गे दोघांचा विषम अति आयुष्य-पथ हा
कसा कान्ते चाले सरळ निज संसार-रथ हा ?

कसा कान्ते चाले सरळ निज संसार-रथ हा
परी हेंही मातें झणिं उलगडे गूढ अहहा !
असावें आनन्दी सततहि तुवां, भूषण मला,
तुला जाणायाची अवगत ‘ पती-हृद्गत ’ कला

यदा द्याया येशीं सजव मज आलिङ्गन सखे
यदा घेशीं वक्षीं मम, मधुर निद्रा क्षण सुखें
यदा घेशीं भावा मदिय हृदयींचे समजुनी
तदा येती कैसे रमणि तव गे नेत्र भरुनी !

तुला चुम्बीतां मी हळुंच मिटशीं लोचन जधीं
तुझ्या माझ्या जेव्हां तनुवरतिं रोमाञ्च उठती
यदा तूं निश्वासां मम, भरुनिया ठेविशि मनीं
तदा येती कैसे रमणि तव गे नेत्र भरुनी !

## इषारा—

( वृत्त–तुङ्गभद्रा )

पञ्जरींच्या पांखरांनो, घ्या भरारी अम्बरीं
पङ्ख झाडा लौकरीं

पञ्जरींच्या श्वापदांनो, जा पळा जा जङ्गलीं
काय झालां पाङ्गळीं ?

पल्वलींच्या मण्डुकांनो, वृत्ति द्या ही सोडुनी
जा नदी गाठा झणीं

मण्डपींच्या वल्लरींनो, वाढ ना द्या खुण्टुनी
दूर जा फोफावुनी

हिन्दभूच्या लेंकरांनों, स्वोन्नती घ्या साधुनी
शृङ्खला तोडा झणीं

---

## मुलांच्या सृष्टींत

( वृत्त-वसन्ततिलका )

मित्रा, असेल तव चित्त जरी उदास
झालें असेल तव जीवित वा हताश
घेई तरी निज कडेवर लेंकरास
होईल रे हृदयिं वत्सलता-विकास

गोन्जारुनी मधुर घे शिशु--चुम्बनास
पावेल किल्मिष तुझ्या मनिंचें विनाश
हो बाळ, शैशव तुला तव आठवेल
स्वप्नीं सुरम्य तव चित्त पुन्हा रमेल

झाडावरी मधुर कूजन पांखरांचें
हें बोबडें सदानिं भाषण लेकरांचें
हे स्वैर बाळखग जों उडती नभांत
तों बाळकें चपळ बागडती घरांत

हें एक रोदन करी शिशु पाळण्यांत
हें एकटेंच दुसरें रत खेळण्यांत
हें राङ्गतें, तर दुजें बसलें रुसून
हें वाकुल्या हळुंच दावितसें हसून

जेथें अशा सतत चालति बाळ--लीला
ईशांश-वास शुभ जाण तिथेंच झाला
आनन्द केवळ मनास ल्हान बाळ
जातो मनीं विरघळून कठोर काळ

मित्रा, म्हणून सकलां प्रिय मूल--फल
नाहीं तरी हृदय होइल ह मळल;
गाई सदैव कविची प्रतिभा कुणाही
ह्यांच्यावरी, नवल यांत मुळींच नाहीं

## मित्र-वियोग

(वृत्त—आनन्दकन्द)

मित्रा, तुझ्या प्रयाणीं    गेला हुरूप वाटे
माझ्या मुखीं वियोगें    छाया उदास दाटे

हें पांखरूं जिवाचें    आंतून पङ्ख झाडी
मैत्रीविना तुझ्या त्या    वाटे कुठें न गोडी

तूं भेटतांच मातें    ब्रह्माण्ड आठवावें
चित्तीं तुझे सुधेचे    ते बोल साठवावे

ती बेफिकीर वृत्ति    पाहून पांखराची
हर्षाचिया उठाव्या    चित्तांत गोड वीची

ती हांसरी बघोनी    चर्या मला गमावें
तेथें निवान्त हर्षें    ठाणें दिलें असावें

देई तुझी हुषारी    माझ्या जिवा उभारी
हौशी विनोदशाली    तूझा स्वभाव भारी

या जीवितास माझ्या    मैत्री तुझी विहारा
नाहींस तूं म्हणोनी    झालें अतां सहारा

येणार केधवा तूं    हा जीव रञ्जवाया ?
जाणार ही निघोनी    केव्हां उदास छाया ?

## मित्र–भेट

( जाति–बालानन्द )

ये रे ये मित्रा माझ्या    भेटूं दे तुजला राजा
हृदयीं बघ अपरम्पार    हर्षाला आला पूर
त्यांत गडे आपण भाऊ    दोघेही पोहत राहूं

तुझ्या वियोगानें झालें    जीवाला चुकलें चुकलें
तुझ्या वियोगानें माझी    जीवकळा सुकली ताजी
सुख-निर्झर हृदयामधला    शुष्क पुरा आटुनि झाला
वियोग अति जीवा जाची    दशादशा करितो त्याची

ये रे ये मित्रा माझ्या    भेटूं दे तुजला राजा
जीव कसा हा हर्षभरें    स्वच्छन्दें नाचे, विहरे
जीवकळा माझी फुलली    वेली जणुं वर्षामधली
सुख-निर्झर 'झुळझुळ' गाणें    गातो हृदिं मञ्जुळवाणें
होताक्षणिं प्रियजन-भेट    हर्षाची फुटते पेठ

ये रे ये मित्रा माझ्या भेटूं दे तुजला राजा
तव सहवासाची महती मलाच रे कळली पुरती
निसर्गांतली जी गोडी ती न तुझ्याठायीं थोडी
निसर्गांत भटकत जावें कवन कुठें तेव्हां व्हावें
परी तुझ्या बोला बोला कवनांचा जमतो मेळा
सर्व निसर्गाचें सार तव वदनीं करित विहार
कवी निसर्गाचा भाऊ कां न तुझा होइल भाऊ ?

ये रे ये मित्रा माझ्या भेटूं दे तुजला राजा
वसन्त तूं असशी माझा हृदय-निसर्गाचा राजा
तवागमीं फुलतीं कवनें हृदीं, वनीं जैशीं सुमनें
निसर्ग हो वा वसन्त तूं तूं माझा प्रेमळ बन्धू
वसन्त आणिक निसर्ग रे यांहीं जग होतें हसरें
तुझ्यांत दोघांचें नातें एकवटे, अन्यत्र न तें
कां न तुझ्या सङ्गतिमाजीं काव्य-सृष्टि व्हावी ताजी ?

ये रे ये मित्रा माझ्या भेटूं दे तुजला राजा
हृदयीं बघ अपरम्पार हर्षाला आला पूर
त्यांत गडे आपण भाऊ दोघेही पोहत राहूं

---

सं. नं. (वृत्त-शा. वि.) ता.

## निषेध

माझ्या शेतकऱ्यास बोलुनि [illegible]हा काहीं कुडें वांकुडें
हातानें शत ठेवशील भरुनी तूं पापांचे घडें
पाहे बोलुनि त्या ‘ निरक्षर, खुळा प्राणी अडाणी कुणी ! ’
रे तात्काळ दुखण्ड होइल तुझी ती जीभ चाण्डाळिणी
‘ हा आहे कुणि हीन दीन ’ म्हणुनी त्या लाव तूं पाय रे
पङ्गू होशिल, सञ्चरेल तुझिया अङ्गामधें कांपरें
‘ मूर्खा नीच इथून रे कुणबटा ’ डोळे वटारून हें
त्याला तूं म्हणतांच होतिल झणीं डोळे तुझे आन्धळे !

शेतामाजिं खपे अहर्निश, सदा वृत्ती निगर्वी धरी
कान्दा आणिक भाकरीवरि करी तो आपली चाकरी
तूं छायेंत सुखी, करी श्रम उन्हातान्हामधें तो परी
मारी भूकतहान तो परि सदा तृप्ती तुझ्या अन्तरीं
नाहीं स्वार्थ मनीं, न हाव धरिली त्यानें धनाची कधीं
‘ व्हावा नाश तुझा ’ अशी न कुलटा बुद्धी शिवे त्या कधीं
तें साधपण ज्यास भूषण, परी ज्याची भली दानत
त्या ह्या शेतकऱ्यापुढें शिर तुझें गर्विष्ठ व्हावें नत

त्याच्या येइ अवर्षणेंच नशिबीं हें दैन्यवाणें जिणें
त्याचें काळिज काळजींत झुरतें त्या बोलशीं तूं उणें
मी धिःकार अनेकवार करितों ‘ तूं नीच नीचाहुनी ’
हा जाहीर निषेध, ऐस मग तूं कोणी समाजाग्रणी !

## गरीब बिचारा कारकून ! (वृत्त—वसन्ततिलका)

ही सारखें लिहुनि, वांकुन पाठ गेली
ये चाळिशीहि नयनांवरतीं अकालीं
खातों न अन्न, परि तें मजलाच खातें
घ्यायासही सवड होइ न बालकांतें

घ्यानीं मनीं वसतसे बहुधा कचेरी
स्वप्नांतही छळितसे मज कारभारी
सत्तामदें मजसि तो अपमानकारी
वाग्बाण मारित असे, बसती जिव्हारीं

मातापिता कधिंहि टाकुनि बोलले ना !
हा हाय ! मात्र परका छाळितो मला ना ?
अन्नार्थ रक्त शरिरांतिल आटवावें
खातांच जें क्षणिं परी विषसें गमावें

मी–लेखणी, नच दुजें कुणि आप्त तेथें
सारे वरिष्ठजन मानिति तुच्छ मातें
मी रोज रोज मग हाय ! जिवास खावें
होतां तिथून सुटका सदनास यावें

ही दुर्दशा बघुनि ये नयनांत पाणी
टोंचे सदैव हृदया जहरी पराणी
बोलेन मी उलटुनी जर का वरिष्ठा,
जाईल घास मुखिंचा भय हेंहि चित्ता !

नाहीं कुठेंहि वशिला मम, नोकरी कीं—
देतील येउनि दया मज दुष्टलोकीं
कां मृत्युचे न पडती करपाश कण्ठीं ?
छातीवरील तरि जाइल धोण्ड मोठी !

---

## तुडवलेला गुलाब

( जाति–साकी )

उसना आणुनि रुसवा तरुणी यौवनमत्ता कोणी
वल्लभ–हृदया विन्धू पाहे भृकुटी-भङ्ग करोनी

भुलला अधिकच अधीर नर तो गोड तिच्या रुसव्यानें
घेउन ताजा गुलाव गेला तिजपाशीं प्रेमानें

अम्बाड्यावर पुढें रसिक तो गुलाब खोवूं लागे
तों मानेला हिसडा देउनि उठली रागें रागें

त्यासरशीं तें फूल बिचारें विशीर्ण झालें हाय !
त्या प्रमदेचा आणिक त्यावर नकळत पडला पाय

पुढें मनोहर दम्पतीस त्या दिलें प्रसूनें मूल
मूल नव्हें तें नन्दनवनिंचें सुरेख हंसरें फूल

त्या बाळाच्या परन्तु लीला पाहवल्या नच काळा
त्या दुष्टानें क्षणांत त्याचा केला चोळामोळा

शोकावेगें मग तीं दोघें रडलीं धायीं धायीं
स्मरणांतुन तो गुलाब त्यांच्या कधिंही गेला नाहीं

———

## ' बा कांहींतरि गा नवीन '  ( वृत्त–शा. वि. )

' बा कांहींतरि गा नवीन, ' कविता आज्ञापिती जाहली
नाहीं काय कवीश केशवसुतें आज्ञा तिची पाळिली ?
होता त्या प्रतिकूळ काळ तरिही स्फूर्तिप्रभावामुळें
शून्यामाजिं विशाल अम्दुत तयें प्रासाद कीं निर्मिले !

" गाऊं काय नवीन ? सर्व सरलीं गूढें निसर्गांतलीं
गातों तेंच फिरून, पूर्व कविंनीं जें गाइलें भूतलीं "
गेली यत्प्रतिभा विझून वच हे बोलोत कोणी कवी
स्फूर्तीच्या प्रहरांत सत्कवि सदा गाईल गाणीं नवीं

' मी गाईन नवीन काव्य, ' नच हा विश्वास ज्याच्या मनीं
जाणा दुर्बळ तो, कधीं न कविता गाईल ओजस्विनी
आहे आजवरी स्वभाव कविंना हा भोंवला नेभळा
हा ! हा ! मार्ग विडम्बनास करुनी त्यांनीं दिला मोकळा

शब्दांचे चढवून साज नुसतें कां वाञ्छिती वाहवा ?
वाहे स्वानुभवांमधून असला तेथें जिव्हाळा हवा !
झाली प्राप्त कवींत केशवसुता का एरव्ही थोरवी ?
काव्यीं दाखवुनी प्रदेश नव, तो झाला कवींचा कवी !

---

## वाटसरू

( जाति–मञ्जरी )

जाईन सडक ही मी पायीं चालुनी
पाहीन वनश्री आसमन्त लोचनीं
पाण्ढरी सडक ही वनप्रदेशान्तरीं
हिमनदी–प्रवाहापरी दिसे साजिरी

मैलांचे पाण्डुर वर्णाचे फत्तर
मज साङ्गतील, चाललों किती अन्तर ?
वट, निम्ब, पिम्परी, नान्दुरखी, पिम्पळ
देतील मला साउली सान्द्र शीतळ !

साळुङ्की, चिमण्या, राघू हीं पांखरें
किलबील गान गातील मञ्जुळ स्वरें
लागतांच चाहुल खार चपळ चञ्चळ
झाडावर भुरकन् चढून मज पाहिल

नुकतीच लागली फुटूं चैत्रपालवी
तकतकित गुलाबी दिसेल पानीं छवि
देईल गुच्छ मज हौशी गुल्मोहर
गाळील सुवासिक आम्रहि निज मोहर

स्वागतास माझ्या नाहीं कांहीं उणें
कोठेंही नाहीं वाटणार मज सुनें
गाडिवान किंवा वाटसरू एकला
भेटेल, विचारिल नांव गांव तो मला

'मी पुण्याकडिल', 'अन् आपण हो कोठिल?
येथून गांव किति कोस दूर पाटिल!'
होउन ही भाषा रामराम घेउनी
धुधरीन मार्ग झपझपा पाय उचलुनी

---

## पांखरांची शाळा

( छन्द–ओवी )

पांखरांची शाळा भरे पिम्पळावरतीं
चिमण्यांचीं पोरें भारी गोङ्गाट करती
उतरतें ऊन, जाते टळुनी दुपार
पारावर जसा यांचा भरतो बाजार !
बाराखड्या काय आई घोकती अङ्गणीं ?
उजळणी म्हणती का जमूनी रङ्गणीं ?
तारेवर झोके घेती बसूनी राङ्गेंत
भुर्रकन इथें तिथें उडती मौजेंत !
खेळकर मुलें, नको कराया अभ्यास
परीक्षेंत कां न आई व्हायचीं नापास ?
लक्ष यांचें पाङ्गलेलें पेरूच्या बागेंत
मास्तरच यांना हवे आमुचे रागीट !
पावसाळ्यांतही शाळा आमुची न गळे
गळकी ग शाळा यांची भिजती सगळे
रविवारीं सणवारीं आमुच्यासारखी
यांना नाहीं सुटी, भली मोडली खोड कीं !
यांच्याहून आम्ही आई शहाणे, नव्हे का ?
गप्प शाळेमधीं, कधीं धरितो न हेका
होतों पास आम्ही, देती दिपोटी बाक्षिस
मौज काय साङ्गूं ! मिळे सुट्टीही शाळेस !

## फुलपांखरूं

( जाति–यमुनातट )

फुलपांखरूं
छान किती दिसतें
फुलपांखरूं ॥ ध्रु० ॥

या वेलीवर फुलांबरोबर
गोड किती हंसतें
फुलपांखरूं

पङ्ख चिमुकले निळे जाम्भळे
हालवुनी झुलते
फुलपांखरूं

डोळे बारिक करिती लुकलुक
गोल मणी जणुं ते
फुलपांखरूं

मी धरुं जातां येइ न हातां
दूरच तें उडतें
फुलपांखरूं

———

## झोका

(छन्द–ओवी)

झोका असा देई
वर आभाळांत जाई
भिरभिर वारा वाही
भाऊराया

झोका असा देई
पक्षी उडूनीया जाई
पहावया वनराई
भाऊराया

झोका असा देई
खालींवर जाई येई
'जो जो' गोड गाणें गाई
भाऊराया

## गोकर्णीचें फूल

( जाति—गोविन्द )

गोकर्णीचें फूल  बाई
गोकर्णीचें फूल ॥ ध्रु० ॥
हलतें डुलतें
वेलीवरतें
मना पाडितें भूल
निळा पाण्ढरा रङ्ग  याचें
कोमल भारी अङ्ग
गोजिरवाणें
जणूं यशोदा—
माईचें हें मूल
याचा आहे डोल  जसा कीं
कानीं झुलतो डूल
महादेव शिरिं
धरी लाडकें
गोकर्णीचें फूल

## भूर जाऊं ! ( जाति–परवशता )

मज म्हणशीं ‘ भूर जाऊं ’
आई, कुठें साङ्ग तें ? ॥ ध्रु० ॥
थवा पांखरांचा जातो
उडुनि काय तेथें ?
सडक घेत वळणें गेली
थेट काय तेथें ?
नदी जाय वाहत अपुली
काय त्या दिशेतें ?
शीट जात फुङ्कित का ही
आगगाडि तेथें ?
तिथें टपालाची गाडी
डाक काय नेते ?
तार काय पोस्टाची ही
घुमत जाय तेथें ?
म्हणति मुलें, ‘ भरते यात्रा
फार जङ्गि तेथें ! ’
‘ भूर गडे आपण जावें ’
मनीं फार येतें !
खूप मला मिळतिल मौजा
पाहण्यास तेथें !

## दूर कोठें तरी

( जाति–मञ्जरी )

सोडून शहरची रहदारी येथली
जावेंसें वाटे मज एकान्त-स्थळीं

हीं हिरवीं गवती कुरणें ओलाण्डुनी
त्या मळेकऱ्यांच्या चिमण्या वाडीहुनी
शिन्द्यांच्या सुन्दर आम्बेराईकडे
जनदृष्टी चुकवुन जाणें मज आवडे

पालवीत वृक्षां राईमधुनी घुमे
गम्भीर वायु जणुं नगाराच दुमदुमे
वाहून दऱ्याखोऱ्यांतुन ये निर्झर
दोतटीं लव्हाळी निळी खुले सुन्दर

तीं तरवड झुडपें फुलून पिवळीं किती
मखमलीसवें डोलती, गोड हासती
ओरडती बेडुक, फिरती फुलपांखरें
येतात उडोनी कधीं रानपांखरें

ये कधीं जनावर चुकून पाण्यावरी
ये कधीं गुराखी वाजवीत पांवरी
पाण्यांत तरङ्गाति तारे तिन्हिसाञ्जचे
त्या ओढ्याकाठीं रमणें मजला रुचे

झिम्झीम पडे पाऊस त्यांत हिण्डणें
नाचती सरी त्या तालावर गुङ्गणें
दरवळे वास मातीचा तो हुङ्गणें
भोंवतीं स्वताच्या घालावीं रिङ्गणें

टवटवून गेल्या हरित शिवारांतुनी
ती कीटक-सृष्टी किर्र घुमविते ध्वनी
तो ऐकावा घडिघडी कान देउनी
गूढार्थ त्यांतला घ्यावा समजावुनी

सोडून शहरची रहदारी येथली
जावेसें वाटे म्हणून मज या स्थळीं

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वच्छ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ..........
ठाणे.

## गुल्मोहराचीं फुलें

( जाति—साकी )

गुल्मोहर तो डोलत होता वसन्तवातासङ्गें
गुच्छ फुलांचे हासत होते अनुरागाच्या रङ्गें

पालवलेलें वसन्त-वैभव, लाल गुच्छ हसरे हे
शोभा देती तरूस, सहजीं दृष्टी खिळुनी राहे

त्यांतिल काहीं वाऱ्यावरतीं झोके झोके घेत
हळुंच पाहती डोकावोनी खिडकींतुनि मौजेंत

झालों होतों गुङ्ग विचारीं भङ्ग जाहला तोंच
सहजच तेव्हां विचारिलें मी कशास करितां नाच ?

काय तुम्हांला.हवें ? फुलांनो कां येतां फिरफिरुन ?
कान देउनी काय ऐकतां ही माझी गुणगूण ?

हिणवाया का जमला पाहुनि मजला दुःखी कष्टी !
क्षीण कसा हो आल्यावांचुनि राहिल माझ्या चित्तीं ?

मग हें हसणें, क्षणीं डोलणें, ही आनन्दी वृत्ति
वृथाच आहे, ठरेल तुमचा फोल भ्रम हा अन्तीं !

वैभवदाता वसन्तराया निसर्ग फुलवित आहे,
सेवा त्याची करोनिया निज शरीर झिजवावें हें

श्रीमन्तीचा डौल धरोनी कराल जर उपहास
हा ! मूढांनो, पोकळ वैभव ! होइल निमिषीं ऱ्हास

मञ्जुळ वाऱ्यासवें बोलतां कसल्या गुल्गुल् गोष्टी
येतां जातां उपहासुन मन कशास करितां कष्टी ?

लालभडक ही मोहक कान्ती, मला न किम्मत त्याची
अधिक शोभती खरी परीक्षा कळल्यावर हृदयाची

विचार-भङ्ग न सहन होउनी चढे मना उद्वेग
तेथुन गेलों निघुनि, मनांतिल शान्त कराया राग

वर्षा आला, धुळीस गेलें वैभव सर्व मिळून
सोसाट्याचा वारा येउनि गेले गुच्छ गळून

## एकच

( जाति-प्रणयप्रभा )

ही एक तुझी जळती पणती
उजळील दिवे लाखोंगणती
काळोखाची कभिन्नकाळी
छाया जी पडली अवकाळीं
बसेल दडुनी ती पाताळीं
आणील दिवाळी, मिणमिणती–
ही एक तुझी जळती पणती

ही एक तुझी सच्छिल वृत्ति
निर्मील सन्त सारे जगतीं
मित्रांचा जरि तुटला थारा
ना धन, ना घरदार, न दारा
अशा विपत्तीमधें उदारा
जमवील भक्त तुझियाभंवतीं
ही एक तुझी सच्छिल वृत्ति

हा एक तुझा सुत एकुलता
परि वाढवील तव वंशलता
    गतबाळांच्या शोकानें मन
    जळून गेलें, आशेचें सुम—
    होरपळें, फिरुनी तेथें पण
फुलवील सारखी वत्सलता
हा एक तुझा सुत एकुलता

ही एक चेतनेची ठिणगी
लावील आग जागोजागीं
    देश अचेतन भडका उडतां
    पुन्हां सचेतन होइल पुरता
    लढेल तो स्वातन्त्र्याकारितां
भरवील नवें वारें अङ्गीं
ही एक चेतनेची ठिणगी

## दर्शन

( वृत्त – शा. वि. )

चन्द्राची मधु कौमुदी अवतरे कीं मूर्त आल्हादिनी
किंवा एकवटून पुष्पगुण ही येते सुगन्धा कुणी
सङ्गीतांतिल माधुरी तरळते किंवा मनोमोहिनी
वासन्ती रमणीयता विहरते उत्साहसंवर्धिनी

कीं राष्ट्रा नवजीव देत फिरते स्वातन्त्र्यदेवी स्वतां
राजैश्वर्य सुशोभिता प्रगटते किंवा यशोदेवता
अज्ञानांतुन उद्धरीत जनता कीं सञ्चरे जागृति
येते वैभव दाखवीत अपुलें कीं मूर्त राष्ट्रोन्नति

साधूची जणुं शान्तवृत्ति अहहा ! ही देतसे दर्शन
कीं आशा प्रगटे जिवास दुबळ्या जी होतसे जीवन
सत्काव्यांतिल कीं सदेह विलसे ही भावना कोमला
द्याया दीनजनांस दान विचरे देवी दया वत्सला

मातें मङ्गल द्यावयास वर ही ये देवता सुन्दर
भाग्याचें मम आजपासुन खुलें होणार हो मन्दिर !

## एक स्वप्न ! (वृत्त—शा. वि.)

कण्ठीं गोंवुनि माझिया कर तुवां नेलें फिराया मला
आलों मीहि सहर्ष, शब्द नव्हता केव्हां तुझा मोडला
होती रात्रहि चान्दणी, प्रिय तुझी प्राणांहुनी सङ्गत
गेलों चालुनि वाट दूर, गमती गप्पांमधें रङ्गत

मागें आपण पाहिलें वळुनि तों नागाकृती पाण्ढरी
आली स्वच्छ दिसून वाट नयनां चन्द्रप्रकाशान्तरीं
'ती रे खूण पहा इथून दिसते !' तूं बोलशीं नन्तर
'जायाचें तिथ आपणांस सुद्धा चालून हें अन्तर'

जातां त्या स्थळिं, मार्ग दोन दिसले जे वेगळे जाहले
'हा माझा पथ, तो तुझा' वळवुनी तूं बोलशीं पाउलें
ज्योत्स्नामण्डित सूक्ष्म होत पुढती गेली तुझी आकृति
होतों मी किति वेळ पाहत उभा, झाली भ्रमिष्ठा मति

भासे शून्य उदास ! मार्ग पुढला माझा दिसेना मला
मित्रा मी तुजवीण रे जिवलगा जाऊं कसा एकला ?

## हा कोण पुरुष ?

( जाति–मञ्जरी; अन्तरा–
मालिबाला )

हा कोण पुरुष ग माझ्या दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून ॥ ध्रु० ॥

टक लावुन माझ्याकडे पाहिलें हंसून
अन् बिजलीवाणी गेला दृष्टीपुढून
जातांना बाई बघून मजला फिरून
स्वारानें नेलें माझें मानस हरून
टपटपल्या टापा ऐकूं येती अजून
धुरळ्यानें गेली पायवाट ही बुजून

मी डोळांभरुनी नाहीं पाहिला
हा जीव भुकेला बाई राहिला

हा कोण पुरुष ग माझ्या दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून

हें स्वप्न वडीचें पडून गेलें उडून
आठवतां येई पुरतें नच आठवून
आन्धळी जाहल्यें कशि पाहूं न्याहळून
गत कशी करूं, मी गेल्यें ग गोन्धळून
दवडली सन्धि ती येइल कैशी फिरून
धुरळ्याविण कांहीं दिसे न मजला दुरून

हा असा पुरुष ग बाई मोहरा
मी नीट पाहिला नाहीं चेहरा

जीवाला चटका लावुन दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून

ती मूर्ति मनांतुन कधीं न जाइल पुसून
गालींच्या गालीं हसतां हसतां मधून
उमलले हासरे ओठ, शोभली खुलून
ती छटा गुलाबी फुगीर गालांवरून
चमचमलें पाणी विशाळ डोळ्यांमधून
जादूनें भुलल्यें भोळी, गेल्यें दिपून

आठवते मजला बाई एवढें
मज ध्यान राहिलें नाहीं यापुढें

हा कोण पुरुष ग माझ्या दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून

जाताना पाठीमागें दिसल्या दुरून
जर्तारि झिरमिळ्या फेट्याच्या भुर्भुरून
सर्वाङ्ग हलें स्वाराचें बैठक ढळून
त्यासवें ताल दे ढाल पाठिवर डुलून
पण हेंहि दिसाया कुठनं मजला उजून
धुरळ्यानें गेली पायवाट ही बुजून

मज दिशा शून्य या बाई   भासती
मावळे न मनिंची कांहीं   आस ती

कीं पुन्हा पुरुष तो माझ्या दारावरून
माघारा दौडत येइल वारूवरून

---

## कोजागिरी पौर्णिमा

( वृत्त—शा. वि. )

सर्वां आवडती अशी प्रगटली कोजागिरी पौर्णिमा
नाहीं पावत हर्ष मन्मन परी पाहूनि हा चन्द्रमा
मातें पाहुनि मित्र हे विहसती, ' वेडा ' असें बोलती,
हा ! हा ! घोर विचांर घेरुनि मना, त्याला घरें पाडिती

एकामागुन एक बन्धु सगळे नेले अहो ईश्वरें
मी पापी कढतों मनांत, इकडे माता स्वचित्तीं झुरे
' याचें होइल केविं ? ' ध्यास तिजला लागे अहोरात्र हा
मी मातें म्हणतों उदास वचनें ' तूं रे अभागी महा ! '

तुम्ही मात्र खुशाल जागुनि करा कोजागिरी साजिरी
माझ्या तप्त मनें उगाच तुमची पोळेल चिन्मञ्जरी
' बन्धूबन्धुमधीं कली झगडतो, तूं एकला रे सुखी '
मातें कोणि म्हणेल, त्यांस कथितों वाहून मी आण कीं—

आम्ही रात्र परस्परांत असती जागूनिया काढिली
आम्हां कृष्णहि रात्र साच असती कोजागिरी जाहली
आम्ही प्रेमळ बन्धुभाव असतां अश्रूंतुनी दाविला
आम्हां पाहुनिया पिताहि असतां कीं धन्यता पावला

आतां त्यांविण हो भकास दिसतें हें गेह, वाटे मना—
या ओसाडित हाय ! आयु पुढलें खङ्गून जाणार ना ?
या सध्यां दिसतात दोन बहिणी, आनन्द देती तरी
याही आज उद्या कधींतरि परी जातील कीं सासरीं !

## झाडाचीं पानें

( जाति–आलानन्द )

तीं बघ रे भाऊ खालीं झाडाचीं पानें गळलीं
धुळींत मिळुनी जातील पायदळी वा होतील

आजवरी झाडावरतीं हर्षें तीं डोलत होतीं
वाऱ्याच्या झुळुकीसह तीं गुजगोष्टी साङ्गत होतीं

स्वर्गांतच त्यांची वसती जणूं काय भाऊ होती
त्यांस परी वैभव-शिखरीं उन्मादाची ये लहरी

या उघड्या वातावरणीं नर्तनांत गेली गढुनी
परि रस्त्यावरची धूलि ध्यानीं नच त्यांच्या आली

या वेड्यांना कोठेंही रे आतां थारा नाहीं
पाचोळा रस्त्यावरचा नशिबाला आला यांच्या

गोड गोड बोलुनि ज्यानें मूर्खांना खालीं आणिलें
तो आतां वारा कपटी धूळ फेकितो यांवरती

## एका रुष्ट जिवलग मित्रास तिळगूळ ( वृत्त-शा. वि. )

पाहोनी ऋतुकालसङ्क्रमण हें
आनन्द झाला हृदीं

क्रान्ती हर्षद खास होइल तुझ्या
रुष्ट स्वभावामधीं

मी रागावुन बोललों जरि तुझ्या
थट्टा विनोदामुळें

जा जा तें विसरून, शान्त कर हीं
चित्तांतलीं वादळें

हा घेई तिळगूळ, त्याहुन परी
स्नेहार्द्र घे मानस

लाभो आज मला तुझ्या हरपल्या
सन्मैत्रिचें बक्षिस

———

## लुटारूंनीं म्हटलेलें गाणें

( जाति–केशवकरणी )

वेळ किती ही नामी ! गोन्धळ घालूं या मण्डळी
उगवला शुक्र नभोमण्डळीं ॥ धृ० ॥

हा मावळतीला चान्द जात भेटाया हो
जङ्गलभर पसरे त्याची पिङ्गट छाया हो
पाण्ढरीफटक ही उगवत लागे व्हाया हो
चैतपुनव आजला, वाजवूं सम्बळ या देवळीं
उगवला शुक्र नभोमण्डळीं

तळ असेलही उठविला गाडिवानांनीं हो
घाटांतुन खळखळ जातिल गाड्या निघुनी हो
मधु पडेल घुङ्गरमाळांचा रव कानीं हो
भण्डारा उधळून भरूं या खण्डोबाची तळी
उगवला शुक्र नभोमण्डळीं

हीं अजुन घोरते किर्रकिर्र वनराई हो
वेताळ गस्त नुकताच घालुनी जाई हो
जाळींत वाघ कानोसा घेउन पाही हो
गजर करूं देवाच्या नांवें ' जय मल्हारी बळी '
उगवला शुक्र नभोमण्डळीं

जाईल विझुन एकेक नभींचा तारा हो
वाहील पठारावरी झुळझुळू वारा हो
येतील चराया गुरें रानचा चारा हो
रामपहारां नको घडाया पाप हातुनी मुळीं
उगवला शुक्र नभोमण्डळीं

जावोत सुखानें वाटसरू मुक्कामा हो
पाप्यांना आम्हां क्षमा करो परमात्मा हो
सत्कर्मि यापुढें येवो तनु ही कामा हो
घरास जाउन मुलांमाणसां भेटूं, उजळूं कुळी
उगवला शुक्र नभोमण्डळीं

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.......... नं. ..........
ता.............
ठाणें.

## श्रावण बाळ ! (जाति–अक्रूर)

शर आला तो, धावुनि आला काळ
विव्हळला श्रावण बाळ

'हा ! आई गे !' दीर्घ फोडुनी हाक
तो पडला जाउन झोंक

ये राजाच्या श्रवणीं करुणा वाणी
हृदयाचें झालें पाणी

त्या ब्राह्मण-पुत्रा बघुनी
शोकाकुल झाला नृमणी
आसवें आणुनी नयनीं

तो वदला, 'हा, हन्त ! तुझ्या नाशाला
मी पापी कारण बाळा !'

मग कळवळुनी नृपास बोले बाळ
‘ कशि तुम्ही साधिली वेळ !

मम म्हातारे मायबाप तान्हेले
तरुखालीं असती बसले

कावड त्यांची घेउन मी काशीला
चाललों तीर्थयात्रेला

आणाया निर्मळ वारी
मी आलों या कासारीं
ही लगबग भरुनी झारी

जों परत फिरे तों तुमचा शर आला
या उरांत रुतुनी बसला

मी एकुलता पुत्र, कसा हा घाला
मजवरतीं अवचित आला !

त्यां वृद्धपणीं मीच एक आधार
सेवेस अतां मुकणार

जा बघतिल ते वाट पांखरावाणी
द्या नेउन आधीं पाणी

आहेत अन्ध ते दोन्ही
दुर्वार्ता फोडुं नका ही
ही विनती तुमच्या पायीं

मजमाघारीं करा तुम्ही साम्भाळ
होउनिया श्रावण बाळ

परि झाकुनि हें सत्य कसें राहील ?
विधिलेख न होई फोल

काळिज त्यांचें फाटुन शोकावेगें
ते येतिल माझ्या मागें

ध्या झारी....मी जातों....' त्याचा बोल
लागला जावया खोल

सोडिला श्वास शेवटला
तो जीवविहग फडफडला
तनुपञ्जर सोडुन गेला

दशरथ राजा रडला धायींधायीं
अडखळला ठायींठायीं

---

## माझी जन्मभूमि

( वृत्त–शालिनी )

माझा तूतें जन्मभूमि प्रणाम
घ्यावें तूझें मानसीं नित्य नाम
जेथें मोदें खेळताहे निसर्ग
माते, व्हावें कां न मी तेथ दङ्ग ?

ठेवा नांवें वा करा दोषपात्र
‘ कीं हा गेला त्यागुनी आप्तमित्र
त्याला राही आमुची ना स्मृतीही
झाला वेडा; राहिलें भान नाहीं ’

माझ्या चित्ता लोक टोचोत बाण
माते, मानीं त्यांस पुष्पांसमान
भ्यावें मी गे काय लोकापवादा ?
तूझ्या अङ्कीं केविं होईल बाधा ?

‘ मोठ्या बागा शोभती पोपईंच्या
त्यांशेजारीं झोपड्या त्या कुडाच्या
दो बाजूला खोल मोठ्या विहीरी
मागें ओढा, वाहतें शुद्ध वारी ’

रम्य स्थानीं पूर्ण गेलों गढून
मोदें गाई वैखरी धन्य, गान
झाला माझा यांत गे दोष काय ?
जीवाला हे मारिती व्यर्थ घाय !

## बालकवि

( जाति–मञ्जरी )

मज गोड गोड सुचतात आज कल्पना
घडिघडी काव्यलेखनास हो प्रेरणा
सानुलें पांखरूं किलबिल करि कोटरीं
गुणगूण बिनर्थी करितो मी त्यापरी

प्रस्फुरते, अडते, तळमळते वैखरी
अव्यक्त मनांतिल भाव राहतो परी
हीं काव्य–पुस्तकें माझ्या मेजावरी
मज भुरळ घालुनी करिती जादूगिरी

हें मेघदूत, ह्या अरबी काल्पित कथा,
मज बालकवींची कविता प्रिय सर्वथा

मी यक्षपुरीला जाइन मेघासवें
त्या फुलराणींचे गाइन मी गोडवे

तो अश्व कळीचा आणि जादुचा दिवा
सतरन्जी उडती, किति अद्भुत ! वाहवा !
मी फूलपांखरूं जणूं निकुञ्जांतलें
मज सुचें न कांहीं भान सर्व हरपलें

हा पहा चन्द्रमा उगवुन आला वरी
उजळलें क्षितिज, विनटली रम्य शर्वरी
उचमळे सिन्धु लाटांचें होउन खळें
त्यापरी हृदय हेलावुन झालें खुलें

मी रचीन आतां खचित गीत सुन्दर
लागलों लिहूं मग मेजावर सत्वर
( वडिलांनीं माझें कौतुक केलें किती !
कितिवेळ उभे ते पाहत माझी कृति ! )

पण हळूंहळूं डोळ्यांचीं मिटलीं दळें
शिर मेजावर टेकलें कधीं, नाकळे
तों नामी मजला स्वप्न पडूं लागलें
जणुं चलच्चित्रपट, चित्त त्यांत रङ्गलें

## रानजाई

( जाति—मुद्रिका )

'देवाचीं आम्ही गुणी लाडकीं मुलें
विहरलों यक्षिणी-कुञ्जीं हलवून पङ्ख चिमकुले

स्पर्शिल्या कल्पवल्लिच्या कोंवळ्या कळ्या
तों नवल घडे, लाजाळू गालांत गोड हासल्या

सोडिले सुगन्धी श्वास, पाकळ्यांतुनी
बाहेर अप्सरा आल्या पातळें श्वेत लेवुनी

त्या रङ्गण धरुनी गीत म्हणूं लागल्या
तें ऐकत असतां झाल्या चित्कळा आमुच्या खुल्या

पूर्वेच्या क्षितिजावरी तोंच पाहिला
कुणि किन्नर इन्द्रधनूचें छेडीत बीन बैसला

स्वरलहरी झाल्या पङ्ख फुटूनी परी
त्या शान्त हवेवर पोहूं लागल्या पांखरांपरी

शशिकिरणांचे काढून तन्तु रेशमी
मृदु जाळें विणिलें त्यांनीं, गुरफटून गेलों अम्ही

या फुलावरुन त्या फुलावरी गुङ्गलों
गुजगोष्टी बोलत आम्ही त्यांसवें स्वैर रङ्गलों

चन्देरि ढगाच्या विरल विमानांतुनी
ही मौज पहाया आलीं भावण्डें माझीं गुणी

मी ओळखिलीं तीं दिव्यकाय गोजिरीं
जीं बाळपणांतच होती देवाच्या गेलीं घरीं

फडफडले माझे पङ्ख उडुनि जावया
अलगेंच झेलिलें त्यांनीं, बसविलें जवळ आपुल्या

स्मृतिगीतें आम्हीं एकसुरें गाइलीं
डोळ्यांतुन आनन्दाचीं आसवें तदा वाहिलीं

पसरून पङ्ख तों भव्य पुरुष ये कुणी
ओरडलों हर्षें ' बाबा ! ' दिसतांच मूर्ति लाम्बुनी

गोञ्जारुन आम्हां प्रेमभरें चुम्बिलें
तों विमान एकाएकी क्षितिजांत गुप्त जाहलें '

( जाति—मञ्जरी )

परि अकस्मात ही स्वप्नसृष्टि भङ्गली
लोपली लोचनांपुढली चित्रावली
पाहतों चोळुनी डोळे जों मी पुढें
मेजावर दिसलें स्थित्यन्तर केवढें !

जे कागद होते इतस्ततः पसरले
ते जुळवुन कोणी बाजूला ठेविले ?
ठेविले फळीवर ग्रन्थ कुणी लावुनी ?
मग देवदूत का येउन गेला कुणी ?

ही काय चमत्कृति ! जादुगिरी काय ही ?
कवितेची माझी कुठें सानुली वही ?
परि गुणगुण मज ही ऐकू ये कोठुनी ?
मी वळुन पाहिलें, विस्मित झालों मनीं

मी लाजुन लपवीं तोण्ड आपुल्या करीं
भावना गोड लागल्या स्फुरूं अन्तरीं
वात्सल्य-कुतूहलपूर्ण हास्य मोकळें
ऐकून किती मज धन्य धन्य वाटलें !

———

## तूं कोणी परकामिनी—

( वृत्त–शा.वि. )

तो मागील वसन्त, ज्यांत घडलें मातें तुझें दर्शन
तेव्हां आणि अतां—किती फरक हा रूपीं तुझ्या जाहला !
तेव्हां यौवन–देहलीवरि उभी होतीस हें पाहुन—
गेलों गोन्धळुनी, म्हणूं ‘ युवति मी किंवा किशोरी तुला ’

थोडी अल्लड वृत्ति, आणि हंसणें, तेंही किती लाडकें !
लज्जा देइल ना हसूं तुज पुढें हें का तया ठाउकें ?
गेला राजवसन्त; तूंहि अपुल्या गेलीस गांवाप्रति
लावी ती चुटपूट मोहक तुझी गोधूमवर्णाकृति

गेलें वर्ष सरून तोंच दुसरा झाला वसन्तागम
झाली भेट पुन्हां, दिसें मुख तुझें सम्पूर्णचन्द्रोपम
‘ लज्जानम्र कुणी सुशील युवती ’ भासे असें मन्मनीं
मी न्याहाळुन पाहिलें क्षण तुझ्या स्नेहाळ चन्द्राननीं

‘ तूं झालीस विवाहिता ’ हळुंच हें कानीं कुणी कूजिलें
‘ तूं कोणी परकामिनी ’ म्हणुनि मी डोळे झणीं झाकिले

———

## कोठें तरी चाललों

( वृत्त–शा. वि. )

बाहेरी पडलों घरांतुनि अतां, कोठें तरी चाललों
माझें तें मजला न ठाउक, असे, वेडा खरा जाहलों
आईबाप, बहीणभाउ सगळे येतील हे आडवे
आश्चर्यें जमतील पाहुनि मला मार्गीं जनांचे थवे

नम्रत्वें विनवीं तुम्हांस जनहो, ' या प्रेममायेकडे
मातें नेउं नका, उगाच मजला घालूं नका साकडें '
माझा मी अजुनी विचार पुढचा केला नसे अन्तरीं
जाऊनी थडकेन शैल-शिखरीं, लागेल किंवा दरी !

होणारें न चुके कदापि, पुढचें कोणी असे पाहिलें ?
साङ्गा हेंच तुम्ही, कशास भय मीं हें पाहिजे वाहिलें ?
आतां बन्द करा घरांतिल फुक्या अर्थाविना वल्गना
बाहेरील जगा बघा उघडुनी या झाकल्या चक्षुंना

बाहेरी पडलों त्यजून भय मी बोलून ' कोठें तरी '
माझें हें मन सत्य नेत मजला ' उत्कर्षमार्गावरी '

---

## गस्तवाल्यानें पाहिलेली स्वारी

( जाति–दोहा )

पुनवेचा माथ्यावरुनी ढळला खालीं चान्द
गांवांतुन घालुन आलों गस्तीची मी साद

धर्माजी वेस्कर माझा सङ्गें जोडीदार
गांवशिवेबाहिर गेलों ओलाण्डून पठार

चान्दण्यांत बहिरोबाचें डोले शुभ्र निशाण
दीपमाळ काळीकाळी पुढतीं भग्न भयाण !

सामोरा घारकड्याचा भव्य अहा विस्तार !
बसली कीं पङ्ख उभारुन विशाल कोणी घार !

धर्माजी अवचित बोले, ‘ शाळूच्या शेतांत
घारकड्यावरुनी खालीं भुतें कधीं येतात

पुनवेच्या रातीं अपुला सरन्जाम घेऊन,
देवाची स्वारी जाते घारकड्याखालून ! ’

अद्‌भुत हें ऐकुन, आलें शहारून मम अङ्ग
‘ देवाची स्वारी ! ’ अद्‌भुत अद्‌भुत खास प्रसङ्ग !

चौथऱ्यास टेकुन होतों स्वस्थ उभे किति वेळ
काय कुणी अमुच्याभोंतीं करी जादुचा खेळ !

तोंच वदे धर्मा काहीं हृदिं होउनि सञ्चार
' देवाची स्वारी आहे जात, रहा हुश्शार ! '

आणि खरोखर कीं दिसला चमत्कार नेत्रांस
ठेवा कीं ठेवुं नका मग आम्हांवर विश्वास !

आघाडिस राजे, त्यांचे पिछाडीस सरदार
चन्देरी घोड्यांवरतीं होउन गेले स्वार

सरन्जाम चन्देरी अन् चन्देरी शिरपेच
जरिपटका चन्देरी अन् चन्देरी मोर्चेल

चन्देरी त्यांच्या ढाला, चन्देरी तलवार
चन्देरी शिङ्गेंकर्णे, चन्देरी ललकार

राजांची स्वारी गेली पहा अशा थाटांत !
दूर दूर दौडत दौडत दौडत दिसली जात !

कोठुनि ती आली, गेली कुण्या बरें मुलखांत !
अन्तर्हित झाली किंवा पलिकडल्या किल्ल्यांत ?

ठायिं ठायिं अजुनी पडक्या किल्ल्याचे अवशेष
काय बरें फेरी सुचवी राष्ट्राला सन्देश ?

पुण्यशील छत्रपतींच्या प्रथित महाराष्ट्रांत
मर्द मराठ्यांच्या स्वाऱ्या अद्यापिहि निघतात !

## तुळजापुरचा भुत्या (वृत्त–शा. वि.)

होता वेष विचित्र, नांवहि भुत्या, मूर्ती असे सावळी
तेव्हां रात्रहि कृष्ण, साच गमलें ही मृत्युची सावली
घेई तो गिरकीस, धूर उफळे चक्राकृती भोंवतीं
ये वेताळच हा दुजा जणुं करीं घेऊनिया कोलती
अम्बेचा जयघोष मङ्गल करी नाचून उच्चस्वरें
हा तीचा पिढिजाद भक्त बघुनी मागें जरा मी सरें
संस्थापी शिवबा स्वराज्य जिचिया भक्तिप्रसादामुळें
तीचा ऐकुनि घोषही स्फुरण ना अङ्गांत सञ्चारलें
' व्हावें वर्धित वीर्य, नाम तव गे उच्चारिता सङ्गरीं
त्वन्नामा जयदेवता परिसुनी मोदें शिवाला वरी
भक्ती जाउनि भीति मात्र बसली चित्तीं, अशी दुःस्थिति
रायाचे कुलदेवते, जननि गे आली असे सम्प्रति '
होता कष्टत तो शिवप्रभु यदा स्वातन्त्र्यलाभास्तव
त्या काळीं शुभ जन्मतों विधिबळें दोघेहि आम्ही जर
गेला घेउनि भक्त हाच असतां शेला शिवाचा नवा
देतों मन्दिल त्यास मीहि करुनी त्याची अती वाहवा
आतां साम्प्रत मच्छिरावरि असे टोपी तया ऐवजीं
तो मी ' पाटिल ' नाम मात्र उरलों सत्ता न हातीं दुजी
शेला, मन्दिल वा न काहिं दुसरें लाभेल आतां तया
एकेका दिडकीस तो जमवितो, येते तयाची दया !

## रोहिणीस—

( जाति–सृग्विणी )

दूर कोठें असें भ्रमण तव रोहिणी ?
लागलीसे जिवा सारखी ओढणी ! ॥ ध्रु० ॥

पूर्ण खुलली दिसे आज माझी कळा
हर्ष झाला जगा, काय त्याचें मला ?
हृदय माझें जळें तें न पाहे कुणी !

सृष्टिचा सानुला छन्दिफन्दी कवी
स्तोत्र माझ्यावरी गाउनी गौरवी
व्यर्थ भासे तुझ्या सङ्गतीवाचुनी

स्वैर नाहींत गे आपुल्या या गती
राहुनी राहुनी होति ताटातुटी
फिरुनि मङ्गल युती केधवा जीवनीं ?

हाय उत्कर्ष हा असह्य वाटे मला
तुजसवें मी सुखी क्षीण हो जरि कळा
ये, मला भूषवी स्वामिनी, मोहिनी

---

## पश्चात्ताप !

( वृत्त-वसन्ततिलका )

‘ देवा मला जगुनि काय करावयाचें ?
नाहीं कुणी मज जगीं उरलें जिवाचें !
माया मला जननिची कुठुनी मिळाया
हा ! हाय ! काय करुं मी अधमा यमा या ? ’

ऐशी हवेंत घुमली करुणार्द्र वाणी
हेलावलें हृदय त्यां करुणारवांनीं
निश्वास ये श्रवणिं तों बहु दुःखपूर्ण
तो मात्र काळिज करी शतशः विदीर्ण !

उल्हास जेथ फुलवी मम मानसास
निश्वास तों क्षणिं तयास करी उदास
तों जाहला मजसि रोदन-भास ज्यांत—
हे बोल, ‘ अन्त बघतोस किती अनन्त ! ’

लाटा असङ्ख्य उठल्या मम अन्तरङ्गीं
राहे असा मनुज कोण जगीं अभागी ?
पाहून शोकरस--सागर मूर्तिमन्त
अश्रू उभे सहज राहति लोचनांत

' आज्ञेंत राहुनि तुझ्या जननी सुखानें
नाहीं कधीं दुखविलें कटु भाषणानें
गेलीस सोडुन कशी मग लाडक्याला !
वात्सल्य कोठुन तुझें दिसणार बाळा ?

आई, फिरून मज देशिल भेट काय ?
हें होय जीवित वृथाच तुझ्याशिवाय !
पाहूं कुठें तुजसि मी हतभागि आई ? '
शोकें परी अधिक दाटुनि कण्ठ येई

लागे रडूं ढळढळा, जणुं शोकसृष्टि—
निर्मूनि तो तिजवरी करि अश्रुवृष्टि
मन्मानसा अमित दे अनुताप ताप
झाला प्रमाद नच, हें परि घोर पाप !

मातेस जी कटु वदे अपवित्र जिह्वा
जावो झडून, यमदण्ड घडोत देहा
आई नसे म्हणुनिया झुरतात कोणी
जीवन्त तीस छळितो खळ हा कसा मी ?

मातें जिनें बघुनि तोषितचित्त व्हावें
संसारही क्षणभरी विसरून जावें
मत्कीर्ति ऐकुन जिनें कृतकृत्य व्हावें
मी रत्नभूषण अमोल जिला गमावें

जी मूर्त शान्तिच गमे मज माय धार्मी
जीवन्त तीस छळितों खळ हा कसा मी ?
गेल्या गळून नयनांतुन अश्रुधारा
आई तुझ्याविण मला न कुठें निवारा

आधीं तिचेच घरिं जाउनि घट्ट पाय
मागूं क्षमा तरि कशी ? न दुजा उपाय !
'हें काय बाळ....?' कुरवाळुनि मन्मुखास
बोले, तदा सुख किती गमलें मनास !

---

## माझ्या खेडेगांवीं— ( जाति-मञ्जरी )

नावडून मजला शहरांतिल राहणी
सुट्टींत राहतों खेड्याला जाउनी
वडिलार्जित आहे तेथें माझा मळा
राहण्या दुपाखी ' पडाळ ' छोटी मला

लखलाभ मला ती जमीन वतनी जुनी
अभिमानें म्हणतों ' हिचा असें मी धनी '
मोकळी हवा रानची माझिया मना
दे प्रसन्नता, टवटवित करी आनना

मज अपूर्व तेथें आपुलकी वाटते
निर्व्याज खरी रसिकता मनीं दाटते
मी गाणें म्हणुनी मोट कधीं हाकितों
मी कधीं मजेनें गाइगुरें राखितों

शाळूचीं ताजीं कणसें तोडुन कधीं
मी हुरडा खातों बसून शेतामधीं
राहून उभा शेताच्या बान्धावर
चहुंवार पाहतों प्रदेश मी सुन्दर

केळींचा हिरवा बाग तेथुनी पहा
किति आम्बराइची शोभा दिसते अहा !

ही पायवाट वाकडें वळण घेउनी
वाडीस जवळच्या थेट मिळे जाउनी

त्या जुळ्या डोङ्गरामधील खिण्डींतुनी
गेलेली दिसते सडक मला तेथुनी
थोडीशी चढुनी चढण, डोङ्गरावर
जातांना लागे देवीचें मन्दिर

किति दूर दूर त्या क्षितिजाला टेकल्या
दिसतात निळ्या शोभायमान टेकड्या
पाहतों असें सौन्दर्य सृष्टिचें खुलें
मोकळ्या ठिकाणीं मन होतें मोकळें !

ज्ञानाची आपण कमावली जिन्दगी
बुद्धीची आहे आपणास देणगी
आपुल्या ठिकाणीं थोर वसे संस्कृती
वाङ्मयांत म्हणतों 'श्रेष्ठ आपुली कृती'

शहरांत राहिलों म्हणून हो आपणां
सत्कला, सुविद्या, लाभे मोठेपणा
शहराचे आपण सारे आहो ऋणी
परि सदैव इष्ट न शहरांतिल राहणी

## अपयशास आव्हान ( वृत्त-शा. वि. )

ये, माझा कर घात, बा अपयशा, ये काळदूताग्रणी
पश्चात्ताप-शरांस फेकुनि झणीं टाकी मला विन्धुनी
छाया कृष्ण पडेल ती मम मनोराज्यीं तुझी जेधवा
तेव्हां येइल हाय रे अवकळा माझ्या मनोवैभवा

भीतीनें मग काळवण्डुन मनीं जातील या भावना
त्या नैराश्यतमांत अन्ध सगळ्या होतील रे कल्पना
त्यांचें भेसुर चित्र बिम्बित तदा होईल नेत्रांमधें
तो हृद्रावक शोकही प्रगट या होईल वाणीमधें

आश्चर्यें जग भेदरून बघतें त्या धूमकेतूकडे
भाम्बावेल तसाच मी मजवरी येतां तुझें साकडें
एकाकी परचक्र चाल करुनी ये राजधानीवरी
त्रेधा तूं उडवीत येशिल तसा माझ्या मनोमन्दिरीं

दुश्चिन्हें घडतात साम्प्रत मला, येणार तूं निश्चयें
तूं अद्यापि अनोळखी, अजुनि मी तूंतें नसें देखिलें
मी आव्हान तुला दिलें, मज अतां तें पाळिलें पाहिजे
या छायेंत भयाण मी बघ तुझ्या मार्गप्रतीक्षे सजें

---

## सङ्गीत १

( वृत्त – शा. वि. )

सारङ्गीवर गात गोड कवनें हिण्डे भिकारी कुणी
ओव्या शीघ्र कुणी रचून म्हणती जात्यावरी कामिनी
गातो हा कुणि रङ्गभूमिवरतीं गन्धर्व वा कोकिळ
रात्रीं जाय घुमून भाविक-कथासङ्कीर्तनीं देउळ

सङ्गीतांतिल सूर सोत्सुक मनें मी ऐकुनी डोलतों
शोकाचें तम संहरून हृदयीं आनन्द सामावितों
गीतांतील रसानुरूप हृदयीं ओथम्बती भावना
मत्काव्यीं भ्रमरीपरी विहरती नाना नव्या कल्पना

आपोआप उपाधि मी विसरतों सङ्गीत ऐकूनिया
नादब्रह्म फिरे ग्रहासम अहा डोळ्यांपुढें माझिया
माझें जीवित कण्टकांत रुतलें, चिन्ता मला वैरिणी
सङ्गीतांतिल सेवुनी परि सुधा मी राहिलों या जनीं

सङ्गीताविण या टिकेल न जगीं माधुर्य चेतोहर
कल्पान्तांत बुडेल विश्व अवघें सङ्गीत गेलें जर

---

## सङ्गीत २

( जाति–साकी )

सङ्गीताचा अन्तच म्हणजे विश्वाचा कल्पान्त
सङ्गीताच्या सहवासाविण होतिल का श्रम शान्त ?
सङ्गीताची आवड असते जन्मसिद्ध मनुजातें
मनुज कशाला, विश्वगोलही डोलतसे सङ्गीतें
विहङ्ग-सङ्गीतांनीं जाते भरुनी नित्य पहाट
वसन्तराया स्तुती कराया पिक दरबारी भाट
दिशादिशांतुन वारा गाई अप्सरसांचीं गानें
दिव्य गायनें तरूवल्लरी नाचतात हर्षानें
फुलबाळांच्या सुवाससुगुणां स्तोत्रें गाती भुङ्गे
निर्झरही हिरवाळीसङ्गें गीत गाउनी रङ्गे
चराचरा आनन्द द्यावया अवतरले गोविन्द
मुरलीनादें लुब्ध जाहले गोवत्सांचे वृन्द
रजनीसाठीं जागीं होती रातकिड्यांचीं गाणीं
स्वर्गाच्या दारांत गातसे चण्डोलाची वाणी
स्वप्नें सुन्दर तरुणां पाडी रमणीचें सङ्गीत
उठवी किंन्नरगन्धर्वांचीं नगरें अवकाशांत
सङ्गीतांतच महाकवीच्या काव्याचा अवतार
शेषशाहिला हलका वाटे जड जगताचा भार
सङ्गीतांतच भ्रमण करी ती ग्रहमाला गगनांत
सङ्गीताचा अन्तच म्हणजे विश्वाचा कल्पान्त

## वटराज—

( जाति–सूर्यकान्त )

विशाल भुज वटराज आपुले मार्गीं विस्तारुनी
गांवशिवेची राखण करितो पारावर राहुनी

गर्द साउलीखालीं त्याच्या जुन्या समाधी किती !
अवकाळ्या रात्रीं न कुणीही फिरके त्याभोंवतीं

कुणास ठाउक ? असतिल निजले त्यांत थोर पूर्वज
करीत असतिल आत्मे त्यांचे आपसांत कुजबुज !

भोळ्या भावें आम्ही भ्यावें, 'भुतें इथें नाचती
अवसेला, पुनवेला भारी धुमाकूळ घालती'

भित्र्या भूलिस बळी पडे हें दुबळें माझें मन
अन्तरलें ऐकण्यास त्यांचें गूढ करुण भाषण !

## रानजाई

वृक्षराज वटराज तपस्वी, वर भगवा बावटा
आसपास पसरल्या तयाच्या पारम्ब्या—त्या जटा

आसपास वाढला तयाचा वंशच—दुनिया दुजी
ऐसपैस पसरलीं रानटीं कितीक झुडपें खुजीं !

ठायिं ठायिं शेन्दूर भोगुनी फत्तर झाले सुर
असा भव्य विस्तार पाहुनी दडपुन जातो उर !

या दुनियेमधिं वटराया हा साधित आहे तप
काळाचें स्थित्यन्तर पाहे शिरिं साहुनि आतप

विशाल पानें उघडुन बसला इतिहासच बोलता
कथील हा साद्यन्त आपुल्या आयुष्याची कथा !

गतकाळाच्या स्मृती नाचती अन्तःचक्षूपुढें
जीवाला चुटपूट लाविती—मनीं त्यामुळें कुढे

पडलों पाहुन पुरतें आपण दास्य—कर्दमीं फशी
निराश झाला, उदासीनता दाट भरे मानसीं

पिकलीं पानें, जणूं आंसवें खालीं हा गाळितो
समाधिस्थ सुहृदांस कहाणी गहिंवरुनी साङ्गतो



८

‘ स्वातन्त्र्याचा तरु उन्मळुनी पडला खालीं कसा ? ’
याच विचारीं जीव लागला झुरणिस त्याचा असा !

‘ हाय ! साङ्गुनी अजाण लोकां दुःखें हृदयांतिल
काय फायदा ? जयांस गमतो भूतांचा गोन्धळ

त्यापेक्षां हे आलें—आम्ही गळ्यांत घालुन गळे
अश्रुद्वारें उष्ण उम्हाळे आणूं हृदयांतले

दिव्याश्रमय करुणा भावना करिती ज्या रोदन
भयाण रात्रीं उमजुन घेइल कैसें मित्रें मन ?

उदासवाणें एकच गाणें हवेसवें मिसळुनी
आम्ही गातों बाळपणींच्या आठवणी काढुनी

गतभाग्याचे पोवाडे हे गाणारे शाहिर—
जातिवन्त आम्हीच, नका ही सन्धी दवडूं तर ! ’

बोलुनि ऐसें जणुं खदखदा हसतो हा तरुवर !
त्या हास्याच्या लहरी देतो सोडुन वाऱ्यावर !

मध्यरात्र किरकिरे, वात तो देवदूत सञ्चरे
ललकारुन वेताळ गस्त घालीत शिवारीं फिरे

## सुखाचें रहस्य

( जाति–साकी )

न कळे कैशी आयुष्याची वाताहत ही झाली
न कळे कोठुन जीवाला या उदासीनता आली

सुख शोधाया वणवण फिरलों, दुःखच हातीं आलें
सुख लागाया जिवलग कांहीं स्नेही गोळा केले

आयुष्याच्या वाळवण्टि मम वावटळी फिरतात
सुखलालित हे मित्र टिकावे कैसे या गोत्यांत !

नकोच आतां नातगोत हें, नकोत मातें स्नेही
एकान्ताविण शान्त सखा मज कोणी उरला नाहीं

त्या शान्तींतच मला चिरन्तन लाभणार सुख वाटे
त्या शान्तींतच गाणीं गाया स्फूर्ति मानसीं दाटे

तिथेंच माझ्या आयुष्याला जीवन शुद्ध मिळेल
तिथेंच माझ्या काव्यकलेंतिल सार्थपणहि टिकेल

आयुष्याचा काळ दवडिला व्याप वृथा साहून
वृथाच शिणलों मनीं काळजी आजवरी वाहून

हे भगवन्ता, आज सुखाचें रहस्य कळुनी आलें
म्हणुनिच हा मी शुद्ध मनानें गाणीं गाउन डोलें

## मित्रवर्य त्र्यं. ग. बापट यास पत्र ( जाति–आर्या )

मित्रा, तुज हा ' पाटिल गणेश ' करि रामराम बहुवार
होवोत हे सुखावह मुजरे तुझिया मनास हळुवार

झाले तुझ्या प्रयाणा दिवस कितीतरि परन्तु या मूढें
पत्र नसें पाठविलें, याचें पडलें असेल तुज कोडें

पाहून भावनांनीं नवीन ओथम्बलें तुझें पत्र
कळवळला, विव्हळला मनामधें हा गरीब तव मित्र

मित्रा, क्षमा करी मज शङ्का सोडून शुद्ध भावानें
अथवा क्षमा करावी सख्या भावास काय भावानें ?

आहेत कुशल पाठक, सोन्या, चिञ्चाळकर, मन्याबापू
परि सर्व पाङ्गलेले, पूर्वींचा राहिला नसे कम्पू

आतां सर्व सविस्तर कथितों निजवृत्त सानुभव तुजला
आलस्याङ्कुर वाटे अधिकाधिक मन्मनीं असे रुजला

सुट्टींत दिवाळीच्या केलेले बेत सर्वही फसले
हसलें माझेंच मला मन, नियमाधीण हें जिणें कसलें ?

इकडे विद्यादेवी दावी गोडी निजोपसङ्गांत
इकडे कवितादेवी नेइ हिरावून मन निसर्गांत

यापरि जीवाला या लागुन दोन्हीकडून दृढ ओढ
विद्येची, काव्याची दोघांची हाय ! होत धरसोड

आतां नियमित आंखुन दिनचर्या शिक्षणास नेटानें
करितो आरम्भ पुढें मित्रांशीं वागुनी समेटानें

गेल्या दिपवाळीचीं पडत स्वप्नें अजून असतील
गेला विनोद हसवुन आतां ते दिवस काय दिसतील ?

एकेठायीं जमुनी आपण वनभोजनेंहि आचरिलीं
आनन्दि वृत्ति तेव्हां नाहीं सर्वांत काय सञ्चरली

साम्प्रत या दिपवाळिस कोणी कोणास नित्य भेटेना
या जीवनांत गोडी कांहीं केल्या मनास वाटेना

केलें स्थळान्तरा मी, गेलों शिवनेरगड पहायास
शिवजन्म घडून झाला पावन जो पुण्यवान् अनायास

तिकडेंच दङ्ग झालों शिवनेरीचें शिवार पाहून
वाहून चित्त गेलें, सुख आणिक होय काय याहून ?

त्याच शिवारीं झाला माझाही जन्म, म्हणुन अभिमान—
उपजे मनांत, वाटे देवदयेनेंच हा मिळे मान

तेथें बालशिवाचे घुमले आहेत बोबडे बोल
ते क्षात्रतेज करिती जागृत जाऊन मानसीं खोल

हिण्डुन खेडोपाडीं केली सेवा निसर्गदेवीची
तेव्हां काव्यरसाच्या उठल्या माझ्या मनामधें वीची !

गेला उल्हास परी पाउल मी ठेवतांच शहरांत
कोणी भयाण मारी आरोळी दीर्घ चित्त–कुहरांत

हा जीव काव्यलालित होऊं पाहे सदा सुखासीन
बघुनी फास उद्याचा झाला परि आजला उदासीन !

घेईल उद्यापासुन जोडुन हा जीव नित्य कर्मातें
जो आज मोकळा तो उद्यास होईल बान्धला मातें

आतां ही न कहाणी साङ्गूं जातां कधीं सरायाची
भरती हृत्सिन्धूची ओसरुं जातां न ओसरायाची !

स्नेहाळ मित्र पाठक साङ्गे मजला तुझ्याच आठवणी
मन मोकळें करूनी, निज खेदाची करून पाठवणी

ताज्या निर्मळ तेथिल वातावरणांत तव मनामाजीं
दरवळल्या ज्या कविता अमुच्या येतील काय कामा जी !

बागेंतिल जाईहुन मी भोक्ता फार रानजाईचा !
या आवडींत ठेविन तव कवितारूप मान जाईचा

तूं भेटतांच आम्हां होइल सण साजरा दिवाळीचा
सम्भाषणांत अपुल्या होइल मग थाट मेजवानीचा

वाहील विनोदाचा झुळझुळता पाट अन्तरामाजीं
येऊन एकदां जा, हौस गड्या ही पुरी करी माझी !

आहेत पाटलाचे पाल्हाळिक आणि भाबडे बोल
परि त्यांत जिव्हाळ्याचें आहे भरपूर साठलें मोल

हा पत्ररूप वेस्कर देतों धाडुन करावया मुजरा
तुजऱ्याच जाण माझा, निरोप त्याच्याकडून ऐक जरा !

---

## अभङ्ग—लहरी.

( १ )

कुणी दुष्ट मला खुडील या भयें
फुलूं काय नये कलिकेनें

सिन्धू अवचित गिळील या भयें
वाहूं काय नये सरितेनें

कुठारीचा घाव बसेल या भयें
वाढूं काय नये झुडुपानें

पारध्याचा शर विन्धील या भयें
उडूं काय नये पांखरानें

आज उद्यां मृत्यू ग्रासील या भयें
गाऊं काय नये मीही प्रभो !

( २ )

धन्य नरजन्म देऊनीया मला
    देवराया केला उपकार
सृष्टीचें भाण्डार केलें मला खुलें
    लोचन हे दिले आलोकना
दिली ग्राह्य बुद्धी, दिधली जिज्ञासा
    सौन्दर्य–पिपासा वाढविली
कारागिरींतील जाणाया रहस्य
    दिलें रसिकत्व हृदयाला
वाणीस या माझ्या दिली काव्य–शक्ति
    वर्णाया महती देवा तुझी
फेडूं पाङ्ग कैसे ? मी तों दीन अज्ञ
    प्रभो हा कृतज्ञ सर्वकाळ

( ३ )

एका सूक्ष्म बीजावरी गेलें लक्ष
    त्यांत महावृक्ष भासे मला
बाल निर्झराच्या उगमांत मला
    आढळून आला महानद
बोल निघे बालकवीच्या तोण्डून
    ऐकिलें त्यांतून महाकाव्य
प्रभो, तुझ्या एका मङ्गल नामांत
    स्वरूप विराट सामावलें

( ४ )

एक ये वाऱ्याची झुळूक वाहून
काय तिचे गुण साङ्गूं परी !
सहज ती गेली वनराईमाजीं
तिनें तरुराजी डोलवील्या
सहज ती गेली नदीपृष्ठावर
लहरी सुन्दर उठवील्या
सहज ती गेली एका मार्गाहून
पान्थस्थांचा शीण घालवीला
महात्म्याची वृत्ति आपुल्या पावित्र्यें
शेंकडों हृदयें तोषवीते

( ५ )

शरीर हें गेलें रोगांनीं गान्जून
काळीज जळून काळजीनें
जीव करमाया निसर्गीं जाईन
गुण मी गाईन प्रभुजीचे
घरीं आईबाप, लहान भावण्डें
वात्सल्याचे धडे देतात कीं
जिवलग माझा मित्र भेट देतो.
जिव माझा होतो उल्हसित
कांहीं नाहीं माझ्या सान्त्वनाला उणें
म्हणून हें जिणें कण्ठितों मी

( ६ )

पडूं नये फशी पडला पङ्कांत
गजराज, त्यास काढा वरी
सापडूं नये तो सापडला कीट
कोळ्याच्या जाळ्यांत सोडवा त्या
धिप्पाड तो गज क्षुल्लक हा कीट
दोघांचीही गत सारखीच
कोणता फसेल याचा नेम नाहीं
सर्वांकडे वेई धाव प्रभो
फसूं नये परी फसे मी मोहाला
प्रभो तो घालवा लवलाही

( ७ )

दे रे वागणूक सच्छील तुझी ती
माझीया पसन्ती उतरली
दे रे तुझा मनमिळाऊ स्वभाव
त्याजवरी भाव माझा फार
दे रे दोन तुझे तेवढे सद्गुण
घेईन बाणून अङ्गीं माझ्या
दे रे मला तुझें निर्मळ हृदय
याहून मी काय मागूं दुजें ?
देवाजी, असेंच उधार मागून
कल्याण करीन स्वताचें मी

( ८ )

नकळत गेलें गरळ अन्नांत
केला प्राणघात त्यानें परी
नकळत काडी जळती फेकिली
तियेनें हवेली खाक केली
नकळत फन्दफितुरी जाहली
तिनें नाश केलीं कुळें दोन्हीं
नकळत पाप घडलें हातूनी
आयुष्याची हानि केली त्यानें
नकळत देवा असा मी नाडलों
मातीमोल झालों म्हणुनीच

( ९ )

पतङ्गासारखें मन धावें स्वैर
त्याचा सूत्रधार तूंच देवा
मोहाच्या धुक्यांत चुकतां मी मार्ग
तेव्हां पाण्डुरङ्ग वाटाड्या तूं
भवडोहीं माझी झुकतांच होडी
चतुर नावाडी तूंच होशी
सङ्कटाचें येतां धावून श्वापद
करिशी पारध तूंच त्याची
अशी देवा माझी वाहशी तूं चिन्ता
कोण मला त्राता तुझ्यावीण

( १० )

माझा प्रतिपाळ करी ‘ पृथ्वी ’ माय
माझ्यावरी जीव तिचा फार
माझिया जीवना ‘ आप ’ हें जीवन
देतसे वरुण धाडून तें
माझिया मनाचें नैराश्य साराया
‘ तेज ’ सूर्यराया धाडिताहे
‘ वायु ’ ये वाहत डोङ्गरावरून
घालवितो शीण दूर माझा
रत्नांचें भाण्डार उघडें ‘ आकाश ’
ठेवावया खुष मला सारें
‘ पञ्चमहाभूतें ’ हीं तों तुझीं दास
परन्तु सेवेस देशीं माझ्या
प्रभो, कैसा होऊं तुझा उतराई
तुला ही भलाई साजेशीच

---

## वियोगापूर्वी--

( वृत्त–वारुणी )

बान्धवांनो, चित्तहारी स्वप्न हें गेलें सरोनी
आसवांनीं आणि माझे येति हे डोळे भरोनी ॥ ध्रु० ॥

दिव्य या उद्यान–देशीं पांखरें आलीं जमोनी
नाकळे, दाही दिशांना जायचीं का हीं उडोनी ?

नान्दलों एकत्र सौख्यें, बाणिलें बान्धव्य अङ्गीं
हृद्गतें केलीं खुलीं नी दाविलीं ध्येयें वदोनी

भावि आयुष्यांत जाऊं चिन्तनीं जेव्हां गढोनी
या कळ्या ताज्या स्मृतींच्या जायच्या तेव्हां फुलोनी !

मन्मनींच्या गूढ भावां बोलता येई न भाषा
प्रेरणा होऊन कांहीं बोलतों अस्पष्ट वाणी !

योग किंवा भाग्य माझें रम्य या मेळ्यांत आलों
वृत्ति माझी दैन्यवाणी जाहली ताजीतवानी

व्यर्थ रेङ्गाळून होतों भीरु झालों– मूक झालों
बोलका अन् धीट केलें देउनी उत्साह गानीं

घेतली मानून सेवा गोड तुम्ही कौतुकानें
ही तुम्हां शोभे भलाई दाविली जी स्नेह–दानीं

ये वियोगाची घडी ही–दूर कोणी हाक मारी
यापुढें गाईन गाणीं राहुनी अज्ञात कोनीं

शेवटीं साङ्गूं तुम्हांला काय भाई–काय ताई ?
चित्त–मञ्जूषीं स्मृती ही ठेवणें माझी जपोनी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ५१५२
ग्रं. ठाणे (स्थळ प्रत)

# उसनवारी.

निशीथ-गायक— Thomas Edward Brown यांच्या 'Vespers' या कवितेंतील मध्यवर्ती कल्पनेच्या आधारें.

ईश्वराचें वात्सल्य— Coventry Patmore यांच्या 'Toys' या कवितेंतील मध्यवर्ती कल्पनेच्या आधारें.

शाळूच्या शेतांतील शेतकरी— John Drinkwater यांच्या 'Costwold Farmers' या कवितेचें रूपान्तर.

भिकाऱ्याचा पोर— E. Hamilton Moore यांची 'Pan' ही कविता वाचल्यावर स्वतन्त्रपणें लिहिली.

सान्त्वन— James Elroy Flecker यांच्या 'Yasmin' या नाट्यगीतांतील मुख्य कल्पनेच्या आधारें.

काल्पिलेला कल्पान्त—

But the whole world shall whiten here or there

'Golden Journey to Samarkand' by James Elroy Flecker

नैराश्य–राजकवि Tennyson यांच्या प्रख्यात 'Lotus Eaters' या काव्यांतील प्रसङ्ग.

एकच— One lamp lights another nor grows less
Nobleness enkindleth nobleness
—'Yussuf' by Lowell.

श्रावण बाळ—'वासुदेव' भिक्षेकऱ्याचें गाणें
जातो काशीला मायबाप श्रावण। निर्वाणिं लागला बाण

# कवि गिरीश यांचीं पुस्तकें.

**अभागी कमलः**— [ खण्डकाव्य आवृत्ति २ री, पृ. १२० किं. १ रु. ] ' हें काव्य हृदयंगम आहे. विधवेच्या करुण कहाणीचें चित्र अंतरंगांत उठविण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत आहे. '

( प्रो. ) **धोंडो केशव कर्वे.**

**कलाः**— [ खण्डकाव्य पृ. ४० किं. ६ आ. ] ' कथनकाव्य या दृष्टीनें हें काव्य निःसंशय सुंदर असून, प्रेमी जीवांच्या निराशेचें वर्णनहि हृदयंगम आहे. गिरीशांचे शब्द नेहमींच रेशमाच्या धाग्यासारखे पीळदार पण नाजूक असतात. ' **महाराष्ट्र**, नागपूर.

**आम्बराईः**— [ खण्डकाव्य पृ. १२८ किं. १ रु. ] ' येथें नमूद करण्यास आनन्द वाटतो कीं, ' गिरीश ' यांच्या ' आम्बराई ' काव्यांत खरे खालच्या वर्गांतील लोक, त्यांचीं खरीं सुखदुःखें, त्यांचे खरे विचार, त्यांची खरी भाषा इत्यादिकांची ओळख पटते. '

( प्रो. ) **वामन मल्हार जोशी.** ( वि. विस्तार. )

**काञ्चनगङ्गाः**— [ स्फुट भावगीतसङ्ग्रह पृ. १६० किं. १॥ रु.] ' गिरीश हे एक उत्तम प्रकारचे काव्यशिल्पी आहेत. त्यांचें काव्य गंगौघाप्रमाणें शांत, उषेप्रमाणें रम्य व संध्यासंगीताप्रमाणें मधुर वाटतें. '

**गं. दे. खानोलकर,** ( प्रगति. )

**फलभारः**— [ स्फुट भावगीतसङ्ग्रह पृ. ८० किं. १२ आ. ] ' या गीतांची पार्श्वभूमि सौम्य रंगांनीं रंजित झालेली असून, त्यांतून प्रतीत होणारें वातावरण उदात्त व गंभीर आहे. '

**के. नारायण काळे,** ( प्रतिभा. )

**मिळण्याचे पत्तेः**— ( १ ) म. शं. कानेटकर, ५६५ नारायण, पुणें २. ( २ ) आर्यसंस्कृति मुद्रणालय, सदाशिव पुणें २. ( ३ ) परचुरे पुराणीक मण्डळी, मुम्बई ४. ( ४ ) तु. पुं. शेट्ये, मुंबई ४.

---

REFBK-0005142

REFBK-0005142